# प्रकरण तिसरे

## महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री म्हणून राजारामबापू पाटील यांचे कार्य --

( १९६२ - १९६७)

## प्रकरण तिसरे

## मा.श्री.राजारामबापू पाटील : महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री म्हणून कार्य ( १९६२ - १९६७ )

मा.श्री.राजारामबापू पाटील यांनी जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष असताना जिल्हा लोकल बोर्डामार्फत,जिल्हा विकास मंडळामार्फत नवीनच निर्माण झालेल्या सांगली जिल्ह्याच्या विकास कार्यात मा.बापूंनी दाखविलेली योजकता आणि श्रम याला संबंध महाराष्ट्रामध्ये तोड नव्हती.मा.कै.वसंतदादा पाटील,विधान परिषदेचे माजी अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक मा.वि.स.पागे साहेब, कै.रामानंद भारती आणि मा.कै.राजारामबापू पाटील या सामुदायिक नेतृत्वाने या जिल्ह्याच्या विकास कार्याची खोल आणि मजबूत पाया भरणी केली.त्या कार्यामध्ये बापूंचा वाटा सिंहाचा होता हे मान्य केले पाहिजे. संस्थानी मुलूख आणि खालसा मुलूख मिळून झालेल्या या नवीन जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी जीप जाईल असेही रस्ते नव्हते.अशावेळी त्या काळामध्ये ऊन,वारा,पाऊस याची पर्वा न करता एकसारखी पायपीट करुन ग्रामीण विकासगंगेचे दर्शन घडविणाऱ्या प्राथमिक शाळेच्या इमारती,जोडरस्ते,पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी(आड),ग्रामपंचायतीच्या इमारती,सार्वजनिक आरोग्यासाठी सरकारी दवाखाने,धर्मशाळा,इत्यादि प्राथमिक गरजा गावोगावी नेऊन पोहोचविणारा असा नेता दुसरा महाराष्ट्रामध्ये तरी झाला नाही. पूर्व-पश्चिम पसरलेल्या सांगली जिल्ह्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यन्त म्हणजेच पेटलोंढ पासून ते उमदीपर्यन्त या भगीरथाने विकासाची गंगा सर्वत्र नेऊन पोचविली.[१]

वाळवा व शिराळा तालुक्यातील बंदुकीच्या बळावर समाजामध्ये दहशत निर्माण करुन अशांतता माजविणाऱ्या अनिष्ठ प्रवृत्ती मा.बापूंनी नाहिशा केल्या आणि त्या विघातक शक्तीचे विधायक वृत्तीत परिवर्तन केले.सत्ता असो अगर सत्ता नसो सर्वसामान्य लोकांशी एकरुप होणे हे मा.बापूंचे स्वभाव

वैशिष्ट्ये म्हणावे लागेल.त्यांनी एकदा ज्याला आपला मानला मग तो कोणीही असो आगदी शासनातील साधा शिपाई,कारकून ,ड्रायव्हर त्यांच्या भल्यासाठी प्रयत्न करण्यात बापूनी कधीच हायगय केली नाही.[२]

सांगली जिल्हा लोकल बोर्डाच्या माध्यमातून श्री राजारामबापू पाटील हे अनेक विविध लोकोपयोगी सार्वजनिक कार्यामुळे खूपच अनुभवसंपन्न झाले हे कार्य करीत असतानाच मा.बापूनी अनेक कार्यकर्ते आपुलकीच्या भावनेने जोडले आणि त्यांना योग्य ते प्रोत्साहन व मार्गदर्शन देऊन संघटित केले.माननीय नामदार यशवंतरावजी चव्हाण यांच्या तीक्ष्ण दृष्टीला बापूच्या ठिकाणी असलेला अभिजात संघटक व प्रशासक दिसला म्हणूनच मा.ना.यशवंतराव चव्हाण यांनी बापूच्या संघटना कौशल्याचा कॉंग्रेस पक्षासाठी पुरेपूर उपयोग करुन घेण्याचे ठरविले आणि सन १९५९ मध्ये बापूना त्यांनी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्षपद दिले. मा.राजारामबापू पाटील यांच्या पक्ष संघटना कार्यातील प्राविण्याची पदवी म्हणजे हे अध्यक्षपद होय.संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झंझावाती प्रभावाने त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र विशेषत: पश्चिम महाराष्ट्र भाराऊन गेला होता.कॉंग्रेसच्या त्यावेळच्या कठीण प्रसंगी महाराष्ट्र कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मा.बापूनी समर्थपणे पार पाडलेली होती.त्या अत्यंत कठीण अशा कसोटीला ते पूर्णपणे उतरले.महाराष्ट्रामधील पक्ष संघटना मजबूत करण्याचा मा.बापूनी अहोरात्र प्रयत्न केला.[३]

१२ डिसेंबर १९५९ चा दिवस या दिवशी महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीच्या सर्व-साधारण सभेमध्ये मा.श्री.राजारामबापू पाटील यांची महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली.त्यावेळेपासून मा.बापूनी महाराष्ट्रा--च्या राजकारणात अनेक महत्वपूर्ण ठिकाणी वैयक्तिक लक्ष देऊन तेथील कार्य पूर्ण केले. उदा.बारामती मतदार संघातील लोकसभेची पोट निवडणूक मोठ्या हिमतीने यशस्वी करुन दाखविली.त्यावेळी अध्यक्ष या नात्याने निवडणूकीची सर्व सूत्रे मा.बापूच्या हातामध्ये होती.महाराष्ट्र कॉंग्रेसने ही निवडणूक जिंकली.

मा.बापूना मिळालेले हे सर्वात पहिले व मोठे यश होते.दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजच्या ग्राऊंडवर भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाच्या प्रसंगाने बापूचे कार्य काँग्रेस श्रेष्ठींना जवळून पहाण्याची संधी मिळाली. भारताचे पंतप्रधान मा.नामदार श्री पंडित जवाहरलाल नेहरु यांनी बापूंच्या कार्याबद्दल गौरवाचे उद्‌गार काढले.अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशन यशस्वी झाले. याचे सर्व श्रेय अध्यक्ष या नात्याने मा.बापूच्याकडे आले. या शिवाय काँग्रेस संघटना मजबूत केली. युवक,महिला,सेवादल या काँग्रेस अंतर्गत संघटनाही त्यांनी गतिमान केल्या.अभ्यास शिबिरे व काँग्रेस मेळावे भरवून काँग्रेसमध्ये नवचैतन्य आणले. मा.बापूनी काँग्रेस संघटना बळकट करण्यासाठी महाराष्ट्र भर प्रचार व दौरा केला. व लोकमत काँग्रेसबद्दल चांगले करण्याचा आटोकाट प्रयत्न केला हे त्यांचे भरीव स्वरुपाचे कार्य मा.ना.यशवंतराव चव्हाण यांच्या नजरेतून सुटले नाही म्हणूनच मा.बापूना सन १९६२ च्या विधान सभेच्या वाळवा मतदार संघातील काँग्रेस पक्षाचे तिकिट देऊन त्यांच्या कार्याची पावती दिली.[४]

सन १९६२ च्या विधान सभेच्या निवडणुकीमध्ये मा.राजारामबापू पाटील हे विक्रमी मताने निवडून आले. यावेळी मा.बापूना कोल्हापूरच्या मा.डी.वाय. पाटील यांनी सर्व गोष्टींची अतिशय मोठी मदत केली.मा.बापूच्या विरोधी शेतकरी कामगार पक्षाचे मा.एन.डी.पाटील हे उभे होते.त्यांचा या १९६२ च्या निवडणुकीमध्ये पराभव झाला. मा.एन.डी.पाटील यांचाही जनसंपर्क अतिशय मोठा होता.मा.एन.डी.पाटील म्हणजे मुलूखमैदानी तोफ पण दोघांनाही कधीही वैयक्तिक एकमेकांवर टीका केली नाही.मा.बापूनी आपल्या निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ कासेगांव येथील विठ्ठलमंदिरामध्ये फोडण्यात आला होता.मा.बापूनी सर्वसामान्य गोगरीब लोकांच्या पर्यन्त जाऊन त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या, पक्षकार्य करणाऱ्या लोकांशी संपर्क व्यवस्थीतपणे साधल्यामुळे मा.बापू सन १९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये विक्रमी मताने निवडून येऊन भरघोस यश संपादन केले. त्यावेळेचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.कै.यशवंतरावजी चव्हाण यांनी मा.बापूना महसूल व वनखात्याचे उपमंत्री म्हणून नियुक्त केले. मा.बापूची व्यासंगी वृत्ती,विनम्र व स्नेहशील स्वभाव आणि विधानसभेच्या सभागृहात महसूल व

वनखात्यासंबंधी समासद आमदार यांनी मांडलेल्या अन्याय गा-हाण्याचे व तक्रारीचे निवारण करण्याची त्याची तत्परता इत्यादी गुणवैशिष्टयामुळे ते सत्ताधारी आणि विरोधी पक्षीय आमदाराच्यामध्ये थोड्याच कालावधीत लोकप्रिय झाले.[५]

सन १९६५ मध्ये त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.नाम.कै.वसंतराव नाईक यांनी महसूलमंत्री म्हणून मा.कै.राजारामबापू पाटील यांना नियुक्त केले. केवळ अडीच वर्षात उपमंत्री पदावरुन कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद दिले गेल्याचे हे एक दुर्मिळ उदाहरण आहे. त्या काळामध्ये संबंधित खात्याविषयीचे काम मंत्री अथवा उपमंत्री सभागृहात कितपत समर्थपणे व समाधानकारकपणे करतात यावर त्याचे खाते किंवा पदोन्नती बऱ्हंशी अवलंबून असे. त्याकाळी महाराष्ट्र मंत्रिमंडळ द्विस्तरीय मंत्री व उपमंत्री या दोन स्तरांचे असे.मा.बापू आपल्या अंगी असलेल्या कार्यक्षमतेचा निरलसपणे सदैव उपयोग करुन घेत असताना त्याला आपल्या निगर्वी,प्रेमळ व मन -मिळावू स्वभावाची जोड देत असत.या असाधारण वैशिष्ठ्यांच्या जोरावरच मा.बापू उपमंत्र्याचे कॅबिनेट महसूल मंत्री झाले.केवळ संबंधित वरिष्ठांच्यापुढे सर्वस्वी लाचार होऊन सत्तास्थान संपादनाच्या अहमहमिकेत मा.बापू कधीही सहभागी झाले नाहीत. म्हणून मा.राजारामबापू पाटील यांचे महाराष्ट्राचे महसूल मंत्री म्हणून केलेले कार्य अतिशय महत्वपूर्ण आहे,त्याची माहिती खालीलप्रमाणे पाहू.[६]

मा.श्री.कै.<u>राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राचे महसूलमंत्री म्हणून केलेले कार्य --</u>

<u>( १९६२ - १९६७ )</u>

आमदार व मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीचा तपशिल मोठा असला तरी त्याचे सूत्र शासन यंत्रणा लोक-कामासाठी राबविली पाहिजे हे होते.आणि त्याची प्रचिती सचिवालयापासून गांवपातळीवरील ग्रामसेवक तलाठयापर्यन्तच्या सर्व पातळीवर आली पाहिजे यासाठी श्री राजारामबापू पाटील व्यक्तिश: प्रयत्नशील होते.महसूल खाते सांभाळीत असताना खाते पत्रिका जमिन मालकाच्या हाती देण्याचा शासकीय पातळीवरचा अंत्यत महत्वाचा निर्णय मा.बापूनी घेतला आणि तो त्यांनी प्रत्यक्षात आणला.[७]

Maharashtra Land Revenue Code 29 Nov., 1965.

L.A. Bill No.XIV of 1965 ( A Bill to Unify and Amend the Law Relating to Land and Land Revenue in the State of Maharashtra.

Shri R.A.Patil (Minister for Revenue ) : -
Sir , I beg to introduce L.A.Bill No.XIV of 1965 ( A Bill to unify and amend the law relating to land and land revenue in the State of Maharashtra )

While doing so, I beg to State that in-exerise of the power conferred upon him by clauses(i) and (3) of Articls, 207 of the constitution of India the Governor of Maharashtra is pleased to recommend to the Maharashtra Legislative Assembly the consideration of the Maharashtra Land Revenue code 1965.

The Speaker: L.A.Bill No.XIV of 1965 ( A Bill to unify and amend the law relating to land and land revenue in the State of Maharashtra ) is introduced.

Shri R.A.Patil : Sir, I beg to move that L.A.Bill No.XIV of 1965 ( A Bill to unify and amend the lacal relating to land and land revenue in the State of Maharashtra be read a first time.

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र राज्यातील जमिन व जमिन महसूलासंबंधी कायद्याच्या एकत्रीकरणाबद्दलचे हे विधेयक या सभागृहापुढे मांडताना मला फार आनंद होत आहे. सन्माननीय सभासदांना माहितच आहे की, राज्यपुनर्रचना झाल्यानंतर अनेक महत्वाचे प्रश्न राज्यसरकारपुढे उपस्थित झाले. त्यात कायद्याचे एकत्रीकरण हा माझ्या मते एक जिव्हाळ्याचा व तितकाच महत्वाचा प्रश्न होता. राज्य पुनर्रचना झाल्यापासून हा प्रश्न सरकारचे लक्ष वेधित आहे. सन १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेव्हा मात्र या राज्यातील तीन विभागातील जमिन महसूल कायद्याच्या एकत्रीकरणाच्या दिशेने पावले टाकण्यात आली. या विषयावर सध्या चालू कायदे खालीलप्रमाणे आहेत --

(१) मुंबई शहर जमिन महसूल अधिनियम १८७६ व मुंबई भू-मापन अधिनियम,१९१५ मुंबई शहराकरिता.

(२) मुंबई जमिन महसूल अधिनियम १८७९ ,व मुंबई शहर सोडून मुंबई क्षेत्राच्या इतर भागाकरिता.

(३) हैदराबाद जमिन महसूल अधिनियम,१३१७ फसली आणि हैदराबाद जमिनीतील हक्क नोंदणी पत्रक विनियम १३५८ फसली ,मराठवाड्याकरिता आणि

(४) मध्यप्रदेश भू-राजस्व संहीता,१९५४ आणि विदर्भाकरिता व मध्यप्रांत भूमि अन्य संक्रामण अधिनियम १९१६ विदर्भातील चार मध्यप्रांत जिल्हाकरिता.

याशिवाय या विषयावर संपूर्ण राज्याला लागू असणारा मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम १९५७ हा आणखी एक कायदा अस्तित्वात आहे.

वरील वेगवेगळ्या कायद्याचे एकत्रिकरण करुन व एकीकरण संपूर्ण राज्याला लागू होईल असा एक जमिन महसूल अधिनियम तयार करण्याचे काम गुंतागुंतीचे होते. कारण याकरिता राज्यातील वेगवेगळ्या भागात चालू असलेल्या जमिन महसूल पध्दतीचा तौलनिक अभ्यास करणे व त्यातून योग्य अशा बाबीचा स्वीकार करणे आवश्यक होते. या अत्यंत महत्वाच्या व जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत निर्णय घेण्याकरिता शासनाला मदत व्हावी म्हणून राज्याच्या प्रत्येक विभागातील एक असा तीन ज्येष्ठ(सिनियर) जिल्हाधिकाऱ्यांची एक समिती १९६१ साली स्थापन केली या समितीला तीन विभागातील जमिन महसूल कायद्यांचे परिक्षण करुन शासनाकडे निश्चित ( पेसिफिक ) स्वरुपाच्या शिफारसी करण्याचे काम देण्यात आले. या समितीने या वेगवेगळ्या कायद्याचा तौलनिक अभ्यास करुन व काही महत्वाच्या प्रश्नांची वेगवेगळ्या विभागातील सिनियर अधिकाऱ्यांशी चर्चा करुन आपला अहवाल १९६३ साली शासनास सादर केला.आपल्या अहवालात या समितीने जमिन महसूल व वन खात्याने या अहवालाबाबत सिनियर अधिकाऱ्यांची मते मागवून व अधिकाऱ्यांच्या परिषदेत चर्चा करुन व सचिवालयातील संबंधित खात्यांशी विचारविनियम करुन या अहवालाची सूक्ष्म तपासणी केली. महसूल व वन खात्याचे वरील विचार विनिमयानंतर तयार केलेल्या प्रस्तावाची या कामी खास

नेमलेल्या मंत्रिमंडळाच्या उपसमितीने सुक्ष्म तपासणी केली. मंत्रिमंडळाच्या उपसमितीच्या शिफारशीवर मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन जे विधेयक तयार करण्यात आले ते या सभागृहासमोर आहे.

प्रस्तुत विधेयकातील ठळक वैशिष्ट्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यापूर्वी राज्यातील तीन विभागातील प्रचलित असलेल्या जमिन महसूल पध्दतीचे संक्षिप्त समालोचन करणे मला योग्य वाटते.

या देशात प्राचीन परंपरेप्रमाणे राजसत्तेला जमिनीच्या उत्पन्नाचा वाटा घेण्याचा अधिकार आहे हे मूलभूत तत्व जमिन महसूलाच्या आकारणीचा आधार असे राजसत्तेने उत्पन्नाचा किती वाटा घ्यावयाचा हे स्थानिक रिवाजावर अवलंबून असे याच तत्वाचा स्वीकार मनुस्मृती जी प्राचीन काळापासून राज्य व्यवस्थेचा आधार म्हणून मानली आहे तीत केला आहे. भूमिवरील सर्वश्रेष्ठ अधिकार राजाच्या ठिकाणी आहेत असे मानले जाई व सर्वश्रेष्ठ भूस्वामी या नात्याने जमिनीवरील उत्पन्नाचा हिस्सा राजभाग किंवा साकार म्हणून घेण्याचा अधिकार असे. भूमिवरील स्वामित्वाधिकार कृषकाला असले तरी सर्वश्रेष्ठ स्वामी हाच समजण्यात येत असे. आणि त्याच्या वतीने कृषक जमिन करीत असे. म्हणून पिकाचा हिस्सा वसूल करण्याचा शासनाला निर्विवाद अधिकार आहे असे नेहमी मानण्यात येत असे. मनूच्या मते राजाला पिकाच्या १-६ अथवा १।८ अथवा १।१२ भाग घेण्याचा अधिकार होता. या पार्श्वभूमिवर भूमिच्या उत्पन्नाचा अंश म्हणून जमिन महसूल कोणत्याही जमिनीवर आकारण्याचा व घेण्याचा अधिकार राजसत्तेला प्राप्त होतो व राज्यातील सर्व जमिन विशेष कारणाकरिता दिलेली सूट सोडून जमिन महसूल देण्यास पात्र आहे अशी तरतूद या देशातील सर्व जमिन महसूल कायद्यात केलेली आपणास आढळून येईल.

<u>मुंबई शहर</u> --

राज्यातील जमिन महसूल पध्दतीचा विचार करताना एक गोष्ट ठळकपणे नजरेत भरते. ती ही की मुंबई शहरातील जमिन महसूल पध्दती इतर विभागापेक्षा अगदी वेगळी आहे. या पध्दतीचा उगम हा पोर्तुगीजांच्या सत्तेखाली होता, तेव्हा झाला. त्यामुळे मुंबई इलाख्यात ज्या विभागांचा मागावून अंतर्भाव करण्यात आला

त्या विभागापेक्षा मुंबई शहरातील जमिन सत्ता प्रकार वेगळे आहेत. याच कारणासाठी खास मुंबई शहराकरिता १८२७ चा १९ वा विनियम (ठराव ) जारी करण्यात आला. हा कायदा रद्द करुन नंतर १८७६ चा मुंबई शहर जमिन महसूल कायदा जारी करण्यात आला. पोर्तुगीज सत्तेच्या काळापासूनचे विशिष्ठ जमिनसत्ता प्रकार अजूनही मुंबई शहरात प्रचलित आहेत.या शहरातील जमिनसत्ता प्रकारांची वैशिष्ट्ये ध्यानात घेऊन केवळ मुंबई शहराकरिता या विषयकात वेगळे प्रकरण सामाविष्ट करण्यात आले आहे.

पश्चिम महाराष्ट्र विभाग --

मुंबई शहर सोडून महाराष्ट्र विभागातील या विषयावरील कायदा म्हणजे १८७९ सालचा मुंबई महसूल अधिनियम (ॲट) होय. या अधिनियमातील प्रचलित जमिन महसूल पध्दत यापूर्वी भारतात चालू असलेल्या जमिन महसूल पध्दतीतूनच विकास पावली आहे.मराठयाच्या सत्तेच्या सुरुवातीच्या काळात जमिन महसूलाचा गाव हे प्राथमिक घटक होते.जनतेच्या प्रतिनिधीशी विचार विनिमय करुन प्रत्येक गावातून वसूल करावयाचा जमिन महसूल,मामलेदार ठरवित असे ही जमाबंदी (सेटलमेन्ट ऑफ लॅन्ड रिव्ह्युनी ) दरवर्षी होत असे. गावाचा एकूण महसूल ठरविल्यानंतर त्याची वैयक्तिक खातेदारात वाटणी कशी करावयाची हे पाटलावर सोपविण्यात येई व पाटील गावातील पूर्वापार प्रचलित पध्दतीप्रमाणे ती वाटणी करीत असे.यानंतर मग मक्तेदारी पध्दती अंमलात आली.१८१८ साली इंग्रजाचा अंमल दख्खनवर सुरु झाला.तेव्हा त्यांनी मक्तेदारी पध्दती बंद करुन पूर्वीची मराठयाची पध्दती स्वीकारण्याचे ठरविले.सरकारचे हक्क अबाधित राहणे आणि सरकारी कराची आकारणी व वसूली या बद्दलची तत्वे जाहीर करणे या उद्देशाने १८२७ चा १७वा विधिनियम (रिझोलेशन) जारी करण्यात आला.

या कायद्यान्वये जमिन महसूल देण्याची प्राथमिक जबाबदारी जमिन धारण करणाऱ्यावर टाकण्यात आली.जिल्हाधिकाऱ्याला स्वेच्छेनुसार महसुलीची आकारणी ठरविण्याचा अधिकार देण्यात आला. जमिन महसुलाची पध्दतशीरपणे वसूली व्हावी

या उद्देशाने १८४७ साली तीन सर्व्हे सुपरिटेन्डेन्सची एक समिती नेमण्यात आली. १८४७ च्या संयुक्त अहवालात त्याच्या शिफारसी आलेल्या आहेत. त्यात नमूद केलेली महत्वाची तत्वे अशी आहेत --

१) जमिनीची विभागणी सर्व्हे नंबरमध्ये करणे.

२) मगदुराप्रमाणे जमिन महसुलांची आकारणी करण्यासाठी जमिनीची प्रतवारी करणे.

३) हवामान,बाजार,जमिन कसण्याचा दर्जा यासारख्या कायम स्वरुपाच्या बाबी याचा विचार करुन तालुक्यातील जमिनीच्या विभागाचे गट पाडण्याची पध्दत अंमलात आणणे.

४) जमिनीवर कायम स्वरुपाचे अधिका ( फॅक्स्टी ऑफ ट्युर्नर ) देणे.

ही तत्वे सुरुवातीला दख्खन विभागात जमिन व महसूलाची आकारणी करण्यासाठी लागू करण्यात आली होती.ती नंतर त्या त्या विभागात अनुरुप असे आवश्यक ते फेरफार करुन मुंबई इलाख्यातील इतर विभागानाही लागू करण्यात आली. या तत्वानुसार मुंबई इलाख्यातील जमिनीची मोजणी व आकारणी करण्यात आली व या कारवाईला कायद्याचे स्वरुप १८६५ च्या सर्व्हे सेटलमेन्ट ॲक्टने देण्यात आले.यावेळी अनेक खातेदारांनी जमिन महसूलाबाबत माफीचे हक्क उपस्थित केले, त्याचा निर्णय करण्यासाठी दोन समरी सेंटलमेन्ट ॲक्ट जारी करण्यात आले.त्यानुसार या दाव्याचा निर्णय करण्यात आला.याप्रमाणे ज्या जमिनीना जमिन महसूलापासून माफी देण्यात आली,त्यांना दुमाला(माफी) जमिन असे म्हणण्यात येते हे वेगळे कायदे (अधिनियम आणि विनियम ) एकत्रित करुन+ १८७९ चा मुंबई जमिन महसूल अधिनियम जारी करण्यात आला. या कायद्यात जमिन अधिकाऱ्याचे अधिकार, त्याच्या कार्यपध्दतीचे नियम आणि सरकार,जमिन धारणकर्ते व त्याची कुळे याचे हक्क स्पष्ट करण्यात आले. या कायद्यात वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आली.

विदर्भ विभाग --

विदर्भ विभागात पूर्वीच्या मध्यप्रांतातील ४ जिल्हे व व-हाडचे ४ जिल्हे यांचा समावेश होतो. १९५४ ची मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता जारी करण्यापूर्वी या विभागात दोन वेगवेगळे कायदे चालू होते. या कायद्यांना त्याची विशिष्ठ अशी ऐत्याहासिक पार्श्वभूमी आहे. मध्यप्रांतातील जिल्ह्यात इंग्रजाचे अगोदर मराठयांचे राज्य होते.मराठयांच्या काळात सुरुवातीला कमावीसदार व पाटील यांच्या मदतीने दरवर्षी जमाबंदी करण्यात येत असे.त्यानंतर अल्पमुदतीची जमाबंदी करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. या धोरणानुसार कब्जेदार पाटलांशी २० वर्षांच्या जमाबंदीचा ठराव करण्यात येत असे. या ठरावाची कालमर्यादा संपल्यावर १८५४ साली एक जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. या जाहीरनाम्याप्रमाणे पुढील काळात जे जमाबंदीचे ठराव करण्यात येतील त्यावेळी पूर्वापार ज्याचा कब्जा होता किंवा जे आपल्या व्यवस्थेखालील जमिनी लागवडीस आणून जमिन महसूल वक्तशीरपणे देत असत.त्यांना जमिनदारी हक्क देण्यात येतील, असे घोषित करण्यात आले. या जाहिरनाम्याप्रमाणे महसूल मक्तेदार (रिव्हेन्यु फॅार्मर )पाटील,आणि मालगुजार यांना गावावर किंवा महालावर ( महाल हा गावाचा एखादा विभागही असू शकतो) मालकी हक्क देण्यात आले अशा प्रकारचा जो जमिन सत्ता प्रकार अस्तित्वात आला त्याला मालगुजारी पध्दती संबोधिण्यात येते.काही विशिष्ट नियंत्रणाना अनुसरुन मालगुजार गावचा पूर्ण मालक असून गावची व्यवस्था करण्याचा त्याला अधिकार होता व त्याला ठराविक महसूल सरकारला द्यावा लागत असे. याशिवाय जमिनदार हा सुध्दा एक मालकी हक्काचा प्रकार होता.जमिनदारीत अनेक गावाचा अंतर्भाव होत असून संपूर्ण जमिनदारीवर एकत्र जमिन महसूल आकारण्यात येत असे या ठरावाना कायद्याचे स्वरुप देण्यासाठी १८८१ साली पहिल्यांदाच मध्यप्रांत महसूल कायदा जारी करण्यात आला.या कायद्यात जमिन महसूलाची आकारणी व वसूली व त्याकरिता आवश्यक असलेली यंत्रणा त्याची तरतूद करण्यात आली. या कायद्यात १८८९ साली दुरुस्ती करण्यात आली व १९१७ साली नवीन मध्यप्रांत जमिन महसूल अधिनियम जारी करण्यात आला.मालगुजारी प्रथा नष्ट करण्यात आल्यानंतर १९५४ साली हा कायदा रद्द करुन त्याऐवजी चालू मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता(एम.पी.लॅन्ड रेव्हिन्यूनी

कोड ) अंमलात आणण्यात आला.याशिवाय या विभागात सी.पी.लॅन्ड ॲलिनेशान ॲक्ट हा एक विशेष कायदा अस्तित्वात आहे. या कायद्याचा उद्देश आदिवासी (ॲबॲारिजनल ) जमिन मालकांच्या हितसंवर्धात रक्षण करणे व त्याच्या जमिनी यांच्याच ताब्यात राहणे हा होता विशिष्ट विभागानाच हा कायदा लागू आहे.

व-हाडचे जिल्हे --

सन १८०३ पर्यन्त व-हाडात मराठयांचे राज्य होते. त्यानंतर तो विभाग निझामांकडे गेला. १८५३ साली निझामाने हे जिल्हे इंग्रजाकडे व्यवस्थेकरिता सोप - - विले .१९०२ सालापर्यन्त इंग्रज या जिल्हाची व्यवस्था विश्वस्त म्हणून आणि नंतर पटेदार म्हणून करीत होते. १९३७ साली मात्र व-हाड ब्रिटिश प्रांताचा भाग झाला.१८६२ ते १८७४ या मुदतीत मुंबईच्या पध्दतीप्रमाणे या विभागातील जमिनीची मोजणी करण्यात आली.१८७९ साली वेरार सेटलमेन्ट रुल्स या नावाने प्रसिध्द असलेले काही साधे नियम करण्यात आले. १८९६ साली व-हाड जमिन महसूल संहिता अंमलात येईपर्यन्त व-हाडचे कमिशनर आणि रेसिडेंट यानी काढलेले वटहुकूम व वर उल्लेख केलेले सेटलमेन्ट रुल्स,तसेच टेनन्सी रुल्स व इनाम रुल्स यानाच कायद्याचे स्वरुप होते. १९२८ साली नवीन व-हाड महसूल संहिता अंमलात आली. ती १९५५ पर्यन्त अंमलात होती व त्याऐवजी आता १९५४ ची मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता अंमलात आहे.

मराठवाडा विभाग --

मराठवाड्यातील जमिन व्यवस्था मुंबई विभागातील जमिन व्यवस्थेपेक्षा फारशी वेगळी नाही.मुंबई विभागात चालू असलेली जमिन व्यवस्थेची तत्वे व कार्य पध्दती याचा अंतर्भाव पूर्वीच्याहैद्राबाद राज्याने केलेले नियम व वटहुकूम यात करण्यात आला होता याना दस्तूर उल-अमंल असे नाव होते व त्यानुसार १९०७ पर्यन्त या राज्याचा महसूल विषयक कारभार चालविण्यात येत असे यानंतर फसली १३१७ चा हैदराबाद जमिन महसूल अधिनियम अंमलात आला. या कायद्यात तोपर्यंन्त प्रचलित असलेले हुकूम व नियम याचे आवश्यक दुरुस्तीसह एकत्रिकरण करण्यात आले आहे.

१८७९ च्या मुंबई महसूल अधिनियमावर (बॉम्बे लॅन्ड रिव्हेन्युनी कोड ) हा कायदा आधारित आहे. याशिवाय या विभागात फसली १३५८ चा हैद्राबाद हक्क नोंदणी पत्रक विनियम (हैद्राबाद रेकॉर्ड ऑफ राईट इन लॅन्ड रिझोलेशन ) सुध्दा चालू आहे. या कायद्यात जमिनीवरील हक्क नोंदणी पत्रक तयार करणे व ठेवणे यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे.

दुमाल प्रकार ( अलीनेशन )

या तिन्ही विभागात जमिन व्यवस्थेच्या ज्या पध्दती प्रचलित आहेत, त्यात जमिनीचे दोन प्रकार करण्यात आले आहेत. एक दुमाला किंवा माफी आणि इतर म्हणजे खालसा (अनअलीनेशन ) सर्व जमिनीवर जमीन महसूल आकारण्याचा राज्याला अधिकार आहे. राज्याच्या या अधिकारात जमीन महसूल घेण्याचा आपला अधिकार हस्तांतरित करण्याचा म्हणजे दुसऱ्याच्या नावे करुन देण्याचा अधिकार अंतर्भूत आहे. अशा प्रकारच्या जमिन महसूल किंवा त्याचा हिस्सा याचे हस्तांतरण करण्यापासून जहागिर, इनाम किंवा दुमाला जमिन अशा जमिनीच्या प्रकारांचा उगम झालेला आहे. अशा प्रकारच्या जमिनी तिन्ही विभागामध्ये होत्या. या जमिनीवरील महसूल पूर्णत: किंवा अंशत: माफ असे व ही माफी सरकारशी केलेली खास करार किंवा त्यांना दिलेला खास अनुदान यास अनुसरुन असे व त्याबद्दल त्या माफीचे अधीन राहून जमिनीवरील महसूलाची आकारणी करण्याबाबत जमिन महसूल कायद्यात तरतूद केलेली असे. दुमाला किंवा माफी गावात इनामदार किंवा जहागिरदार हा वरिष्ठ धारण कर्ता या नात्याने जमिन महसूल देण्यास जबाबदार असे अशा प्रकारे या पध्दतीत जमीन कसणारी आणि सरकार यामध्ये एक मध्यस्थ होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेती सुधारणेबाबत जे वेगवेगळे कायदे करण्यात आले, त्याचा मुख्य उद्देश सरकार आणि शेतकरी यातील मध्यस्थाना शक्यतोवर काढून टाकणे हा होता. पश्चिम महाराष्ट्रामध्ये लागू करण्यात आलेले वेगवेगळे जमीन सत्ता प्रकार नष्ट करण्यासंबंधीचे कायदे (टेनर अबोलिशन अॅक्टस ) विदर्भातील १९५० चा मध्यप्रदेश (इस्टेट, महाल आणि दुमाला जमिनी ) स्वामित्व अधिकार नष्ट करण्याबाबतचा अधिनियम (एम.पी. अबोलिशन ऑफ प्रॉपर्टी राईटस (इस्टेट ,महाल अॅण्ड अलिनेशड लॅन्ड अॅक्टस् १९५०) आणि हैद्राबाद जहागिरी नष्ट करण्याचा १९४९ चा नियम आणि १९५४ चा

हैद्राबाद इनाम नष्ट करण्याचा अधिनियम या कायद्यामुळे हे सर्व माफीचे सत्ता प्रकार नष्ट झाले आहेत. आता फक्त देवस्थान इनाम अस्तित्वात आहेत.माफी किंवा इनाम सत्ता प्रकार नष्ट करण्यात आल्यामुळे जमिनीचे धारक कब्जेदार झाले व ते आता त्याच्या ताब्यातील जमिनीवरील महसूल भरण्यास प्रत्यक्ष जबाबदार आहेत अशा प्रकारे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात रयतवारी प्रथा प्रामुख्याने अंमलात आल्यामुळे जमिन महसूल संहिता एकत्रिकरण्याचे काम बरेच सुलभ झाले आहे व या दृष्टीने या घटनेला बरेचसे महत्व आहे. मुंबई व मराठवाडा विभागात अस्तित्वात असलेला मोजणी सत्ता प्रकार (सर्व्हे टेन्यूअर ) व विदर्भात आस्तित्वात असलेले भूमिस्वामी आणि भूमिधारी यात आता म्हणण्यासारखा फरक नाही.

आता आपण प्रस्तुत विधेयकाच्या काही महत्वपूर्ण वैशिष्ट्याकडे --

महसूल विभाग --

जमिन महसूलाचा कारभार व्यवस्थित चालविण्यासाठी राज्याची विभागणी महसूल क्षेत्रात करणे आवश्यक आहे याबाबत राज्याच्या तीनही विभागात जवळ जवळ सारख्याच तरतुदी आहेत.या सर्व विभागात राज्याची विभागणी विभागात (डिव्हिजन ) विभागाची जिल्ह्यात,जिल्ह्याची उपविभागात (सब-डिव्हिजन ) उप - विभागाची तालुके किंवा तहसील यात तालुक्याची सर्कलमध्ये सर्कलाची राज्यात पटवारी सर्कल यात व राज्याची गावात अशी केलेली आहे.फक्त मुंबई व मराठवाडा भागात क्षेत्रफळ व लोकसंख्येने तालुक्या पेक्षा लहान असलेले महाल अस्तित्वात आहेत. या महालाचा कारभार चालविणारा महालकरी किंवा नायब-तहसीलदार याची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या तालुका किवा तहसील याचा कारभार चालविणाऱ्या मामलतदारांसारख्याच आहेत.आपल्या अधिकारक्षेत्रात मामलतदाराच्या सर्व अधिकारांचा वापर करणारा महालाचा अधिकारी याचा दर्जा मामलेदारापेक्षा कमी असावा हे न्याय वाटत नाही. या बाबतीत अलिकडे सन्माननीय सभासद श्री सदाशिव दौलतराव पाटील यांनीही पन्हाळा महालाचे तालुक्यात रूपांतर करण्याबद्दल प्रश्नाद्वारे सुचविले होते. हा प्रश्न सर्वसाधारण सर्वराज्यासंबंधी असल्यामुळे त्याचा विचार जमिन महसूल संहितेचे एकीकरण करताना केला जाईल असे श्री कल्याणींच्या प्रश्नास उत्तर देताना सांगण्यात आले होते.पूर्ण विचारांती शासनास असे वाटते की,राज्य

कारभाराच्या दृष्टीने महालकरी व मामलतदार यांच्या दर्जातील विषमता नाहीशी करणे आवश्यक असून त्यासाठी महाल व तालुका एका पातळीवर आणणे जरुर आहे. या कारणास्तव प्रस्तुत विधेयकामध्ये राज्यातील सर्व महालाचे रूपांतर तालुके किंवा तहसील यात करण्याची तरतूद केली आहे.

प्रादेशिक बदल --

या विधेयकात या शिवाय महसूल क्षेत्राची रचना करणे आणि त्यांच्या हद्दीत बदल करणे या बाबींचीही तरतूद करण्यात आली आहे असे बदल करण्यापूर्वी अधिसूचनेद्वारा लोकांचे आक्षेप व सूचना मागविणे याची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई व मराठवाडा या विभागाच्या बाबतीत लोकमत अजमाविण्याची ही नवी तरतूद आहे.

सरकारपासून जमिन धारण करणार --

(होल्डर ऑफ लॅन्ड अंडर गव्हर्नमेन्ट )

सध्या सरकारपासून जमिन धारण करणाराना वेगवेगळ्या प्रकारे संबोधण्यात येते.उदाहरणार्थ मुंबई व मराठवाडा विभागात आक्युपंट किंवा कब्जेदार आणि विदर्भ क्षेत्रात भुमिस्थायी,भूमिधारी आणि सरकारी पट्टेदार या जमिन धारण करणाऱ्याचे अधिकारही सारखे नाहीत पण भूमिधारी व दुसरे कब्जेदार यांचे अधिकार नियंत्रित आहेत.

या विधेयकात सर्व जमनी धारण करणारांची वर्गवारी प्रथम दोन वर्गात म्हणजे कायम धारणकर्ते व ठराविक काळापुरते धारण करणारे अशी केली आहे. यानंतर कायमच्या धारण करणारांचे दोन वर्ग करण्यात आले आहेत.

१) जमिन महसूल देण्याच्या शर्तींवर जे कायम धारण करतात आणि ज्यांच्या जमिनी हस्तांतरित करण्याच्या अधिकारावर काही नियंत्रण नाही असे व

२) जमिन महसूल देण्याच्या शर्तींवर जे कायम जमिन धारण करतात पण ज्यांना नाहीत त्यांना कब्जेदार वर्ग २ असे संबोधण्यात आले आहे. काही ठराविक काल मर्यादेपर्यन्त जमिन धारण करणारांना खंड द्यावा लागतो,त्यांना कायम जमिन धारण करणारापासून (कब्जेदार )अगदी वेगळे मानण्यात येते. मुंबई महसूल कायद्यात सरकारी पट्टेदारांचा अंतर्भाव आहे हे दिसून येईल. येथे हे स्पष्ट

करावेसे वाटते की, वरीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात चालू धारणकर्त्यांच्या अधिकारात कोणतीही घट किंवा वाढ करण्याचा उद्देश नाही. पण वर्गीकरण करताना त्यांना कब्जेदाराच्या किंवा पट्टेदाराच्या एका समान कल्पनेखाली आणण्याची तरतूद केली आहे.

जमीन धारण करणारांचा झाडावरील हक्क --

या विधेयकाचे दुसरे एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे धारणकर्त्याच्या खात्यातील जमिनीवर असणाऱ्या किंवा वाढणाऱ्या झाडाच्या हक्काबाबतीत आहे. या बाबतीतील तरतुदी सर्वत्र सारख्या नाहीत. त्या वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या आहेत. एवढेच नव्हे तर मुंबई विभागात जिल्हाजिल्हात वेगवेगळ्या आहेत. सध्या फक्त भूमिस्वामींना त्याच्या जमिनीतील झाडावर पूर्ण अनियंत्रित अधिकार आहेत. दुसऱ्या धारणकर्त्याच्या बाबतीत जी झाडे सरकारने राखून ठेवली नाहीत त्यावर त्याचे अधिकार आहेत, जेथे झाडावर सरकारने हक्क राखून ठेवले आहेत. तेथेसुध्दा ती झाडे सरकारमार्फत प्रथम तोडल्यानंतर त्याचा जो फुटवा (अफ्टर ग्रोथ ) निघतो, त्यावरचे आधिकार मुंबई विभागातील सर्व जिल्हात सारखे नाहीत. मराठवाड्यात पूर्वीच्या हैद्राबाद सरकारने सन १९११ साली एका परिपत्रकाद्वारा राखीव झाडावरील हक्क पट्टेदारांना बहाल केले. मालकी जमिनीतील झाडावरील लोकांच्या या हक्काच्या विषम अधिकाराबाबत या सभागृहात यापूर्वी अनेक वेळा चर्चा झाली आहे.

या संदर्भात सन्माननीय सभासद श्री शांताराम गोपाळ घोलप, बंगो नाना मोईर, लक्ष्मण शंकर म्हात्रे, सदाशिव दौलतराव पाटील, शंकर ढवळू झोले, नारायण ज्ञानू पाटील व मालू हरि वीर यांनी प्रश्नाद्वारे अथवा ठरावाच्या रुपाने झाडावरील हक्काच्या या विषम अधिकारासंबंधी विधिमंडळात प्रश्न उपस्थित केल्यावर त्यावर जी चर्चा झाली, त्याकडे सभागृहाचे मी लक्ष वेधू इच्छितो. याच विषयावर सन्माननीय सभासद श्री आठल्ये गुरुजी यांनीही चालू अधिवेशनात प्रश्न विचारला आहे. या बाबतीत या सभागृहात पूर्वी झालेल्या चर्चेत या सर्व प्रश्नांचा विचार जमिन महसूल संहितेच्या एकीकरणाचे वेळी करण्यात येईल असे शासनातर्फे सांगण्यात आले होते. या प्रश्नांचा पूर्ण विचारकरुन मालकी जमिनीतील झाडावरील सर्व हक्क जमिन मालकांना देण्याबद्दल या विधेयकात तरतूद करण्यात आली आहे. या राज्यात

कोठेही आता मालकी जमिनीत सरकारी हक्काची राखीव झाडे राहणार नाहीत.

या तरतुदीचा परिणाम भूमिस्वामी व ज्यांना अगोदर झाडांचा हक्क दिला आहे असे कब्जेदार सोडून इतर धारण कर्त्यांचा हक्क वाढविण्यात होईल यामुळे राज्याची काही आर्थिक हानी होईल यात शंका नाही.अध्यक्ष महाराज या आर्थिक हानीचा नक्की अंदाज करणे कठीण आहे पण स्थूलमानाने असे म्हणता येईल की मुंबई विभागात वार्षिक २७ लाख व विदर्भात सरासरीत वार्षिक तीन लाख मिळून अशी एकूण ३० लाख रुपये वार्षिक हानी होईल .या योजनेमुळे आपल्या जमिनीवरील झाडाचे हक्क आबाधीत राहतील अशी खात्री वाटून कब्जेदारांनी वृक्षारोपन व संवर्धन करण्यात चांगले प्रोत्साहन मिळेल या अपेक्षेने सरकारने ही आर्थिक हानी सोसण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेमुळे जमिनीची धूप थांबणे वगैरेसाठी आवश्यक असलेली वनाची वृध्दी व वृक्षाची जोपासना याबाबतीत जे राष्ट्रीय थरावर प्रयत्न चालू आहेत त्यानाही गती मिळेल.

जमिनीवर राज्याचा अधिकार --

राज्यात प्रचलित असलेल्या सर्व महसूल कायद्यात अशी तरतूद आहे की,जी दुसऱ्यांची नाही ती सर्व जमिन सरकारची आहे. पुष्कळदा राज्याच्या जमिनीवरील या अधिकाराबद्दल वाद उपस्थित होतात .साधारणत: अशा वादांचा निर्णय महसूल अधिकारी चौकशी करुन करतात.शिवाय या बाबतीत दिवाणी कोर्टात दावा करण्याचीही तरतूद आहे.

सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे झाली असतानाही असे वाद निर्माण होतात. अशा वादाचा त्वरित निकाल करता यावा म्हणून विधेयकात तरतूद केली आहे की, प्रथम त्याची चौकशी महसूल अधिकाऱ्याने करावी.ज्या पक्षाकाराला महसूल अधिकाऱ्यांच्या निर्णयाने आपणाला हानी पोहचली आहे असे वाटत असेल त्याला वरिष्ठ महसूल अधिकाऱ्याकडे अपील किंवा फेरतपासणीकरिता अर्ज करता येईल किंवा महसूल अधिकाऱ्यांच्या पहिल्या निर्णयापासून अपिलातील किंवा फेरतपासणीतील

निर्णयापासून नव्हे - एक वर्षांच्या आत केव्हाही दिवाणी कोर्टात दावा करता येईल या तरतूदीचा उद्देश असा आहे की, जमिनीवरील हक्काबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नास हानी पोहचलेल्या व्यक्तीला दिवाणी कोर्टातसुध्दा दाद लावून घेता यावी पण जेव्हा ती व्यक्ती असे करण्याचे ठरविल तेव्हा तिने वाजवी मुदतीत ही कारवाई करण्यास हवी त्यामुळे जमिनीवरील दाव्यांचा अंतिम निर्णय लवकर लागण्यास मदत होईल.

अतिक्रमणाच्या बाबतीत आणखी अशी तरतूद केली आहे की, अतिक्रमण करणाराची इच्छा असेल तर दंडादाखल आकारलेली किंमत व महसूल आकारणी देऊन अतिक्रमण केलेल्या जमिनीचा त्यांच्याशी ठराव करुन अतिक्रमण जिल्हाधिका-याला नियमानुकूल (रिझ्युलाईज् ) Regularise करता येईल. मुंबई शहर जमिन महसूल अधिनियम सोडून अशा प्रकारची महसूल कायद्यात तरतूद सध्या कोठेही नाही, यामुळे मुंबई शहर सोडून शहर विभागात अशा अतिक्रमणाच्या बाबतीत सरकारच्या हुकूमाद्वारे किंवा दिलेल्या सूचनानुसार हल्ली ठराव करण्यात येतात.

शेत जमिनीवर महसुलाची आकारणी व जमाबंदी --

जमिनी महसूलाची आकाराची व ठराव ( जमाबंदी किवा बंदोबस्त ) याबद्दलची तत्वे तिन्ही विभागात जवळजवळ सारखीच आहेत. मात्र काही क्षेत्रात विशेषत: विदर्भातील मध्यप्रांताच्या चार जिल्हात जमीन महसूल ठरविण्याची पध्दत वेगळी आहे. तिन्ही विभागात एक समान व्यवस्था आहे ती अशी की, जमिनीवरील आकार जमिनीचा मगदूर किवा उत्पादन क्षमता ध्यानात घेऊन ठरविण्यात यावा. या उद्देशाने एकजिनसीपणा ( Homogeneity ) हवामान, पाऊस पाणी, वगैरे कायम बाबी लक्षात घेऊन, जमिनीचे गट पाडण्यात येतात. प्रत्येक गटातील जमिनीचे वर्गीकरण जिरायत (कोरडवाहू )मातशेती आणि बागायत असे केले आहेत. आणि या प्रत्येक वर्गात शेताची प्रतवारी ( classification value )मध्यप्रांतातील जिल्हात जमिनीचे गुण ( soil units ) आणि इतर क्षेत्रात आण्याचे स्वरुपात दर्शविण्यात आलेली आहे. जमिन महसूलाची आकारणी प्रमाण दराप्रमाणे( stnadnad rate) करण्यात येते. मुंबई जमिन महसूल कायद्यात केलेल्या तरतूदीचे अनुसार प्रमाण दर

ठरविण्याची योजना प्रस्तुत विधेयकात केली आहे. मुंबईच्या कायद्याप्रमाणे १६ आणे दराच्या जमिनीवरील मुख्य पिकांच्या सरासरी उत्पन्नाची जी किंमत असेल तिच्या १।१६ हा प्रमाण दर असावयास पाहिजे.प्रस्तुत विधेयकात मात्र वरील १।१६ ही कमाल मर्यादा ( maximum ) ठरविण्यात आली आहे. यामुळे जमिनीची परिस्थिती व इतर बाबींचा विचार करुन या कमाल मर्यादेच्या आत योग्य तो प्रमाण दर ठरविण्याची मुभा जमाबंदी आधिकारी ( settlement officer ) यांना राहिल. प्रमाण दर आणि जमिनीची प्रत यांचा विचार करुन शेतीवरील आकार ठरविण्यात येईल.प्रस्तुत विधेयकात जमिनीची प्रत लावण्याची त्या त्या विभागातील पध्दत कायम ठेवण्यात आली आहे.

<u>जमाबंदी किंवा बंदोबस्त कार्यपध्दती</u> ( procédure of settlement )

जमाबंदीच्या कार्यपध्दतीच्या बाबतीत विधेयकात तरतूद केली आहे की जमाबंदी करण्याचा हुकूम देण्यापूर्वी जमाबंदीच्या संभाव्य परिणामाचा अंदाज ( forecast of settlement ) तयार करुन प्रसिध्द करावा व तो विधान मंडळासमोर ठेवावा. दोन्हीही सभागृहाने सहमत केलेला ठराव लोकांकडून आलेले आक्षेप व सूचना यांचा विचार करुन शासनाने जमाबंदीचे काम हाती घ्यावे कि नाही हे ठरवावे ही पध्दती मुंबई विभागातील प्रचलित पध्दतीपेक्षा वेगळी आहे. मुंबई विभागात विधानमंडळाचा सल्ला अखेरच्या आवस्थेला म्हणजे जमाबंदीचे काम संपत आले असते तेव्हा घेतला जातो. विधेयकात तरतूद केलेल्या योजनेचा फायदा हा आहे की,जमाबंदीचा परिणाम काय होईल,याची पूर्वकल्पना शासनाला व विधानमंडळाला करता येते.त्यामुळे जमाबंदीचे काम हाती घ्यावे की नाही याचा निर्णय अधिक चांगल्या रितीने घेता येतो.शिवाय जमाबंदीचे काम संपत आले असताना अखेरच्या अवस्थेला ते स्थगित करण्याचा निर्णय घेतला तर तोपर्यन्त होणारा काळाचा व वित्ताचा अपव्यय वाचतो.हाही या नवीन तरतूदीचा दुसरा फायदा आहे.

जमिन सुधारणा महसूल आकारापासून माफ -

शेतावरील महसूलाची आकारणी त्यांच्या उत्पादन क्षमतेच्या आधारावर केली जाते. जमिन मालकाने, स्वकष्टाने व स्वखर्चाने शेतीची सुधारणा केली तर त्याची उत्पादन क्षमता वाढेल व त्या मर्यादेपर्यन्त त्यांच्या आकारातही वाढ होऊ शकेल पण शेतक-यांना आपल्या जमिनीची सुधारणा करुन तिची उत्पादन क्षमता वाढविण्यास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने जमिनसुधारणा महसूल आकारापासून मुक्त करण्याचे तत्व स्विकारण्यात आले आहे. मुंबई आणखी मध्यप्रदेश या दोन्ही कायद्यात या तत्वाचा अंतर्भाव आहे. फरक हा आहे की विदर्भात सुधारणा करापासून कायमच्या मुक्त आहेत. उलट मुंबई विभागात फेर जमाबंदीच्या काळापासून मागील ३० वर्षांच्या आतील सुधारणा मुक्त आहेत. मुंबई विभागाच्या धर्तीवर प्रस्तुत विधेयकात तरतूद केली आहे.

जमाबंदीची कालमर्यादा - Term of settlement --- , अधिभार surcharge .----------- सूट देणे ( Rebate ):-

साधारणत: जमाबंदीच्या वेळी ठरविलेल्या आकाराची हमी एका ठराविक काल मर्यादेपर्यन्त देण्यात येते, याचा अर्थ की या कालमर्यादेत आकारात वाढ करता येत नाही. या विधेयकात जमाबंदीची कालमर्यादा ३० वर्षांनी ठेवण्यात आली आहे. मात्र योग्य कारणासाठी ती कमी करण्याचाही शासनास अधिकार आहे. मुंबई महसूल कायद्यात अशी पण तरतूद आहे की, जीमुळे शेतमालाच्या भावात होणा-या चढउताराला अनुसरुन जमिन महसूलाच्या आकारात वाढ किंवा घट शासनाला करता येईल. अशा प्रकारची तरतूद राज्य सरकार व कर देणारा या दोघानाही न्याय अशी आहे. अशीच तरतूद या विधेयकातही करण्यात आलेली आहे. तीमुळे दर दहा वर्षाच्या अंतराने मुख्यपिकांच्या भावात होणा-या चढ - उताराचा विचार करुन महसूल आकारावर वाढ किंवा अधिभार ( surcharge ) लावण्याचे किंवा सूट देण्याचे ( rebate ) आदेश सरकारला देता येतील ही तरतूद विदर्भ व मराठवाडा विभागाकरिता नवीन आहे.

<u>अकृषिक आकार</u> ( Non-Agricultural Asseasment ) :

सध्याच्या आर्योगिक करणाच्या काळात अकृषिक म्हणजे बिनशेती आकाराच्या विषयाला फार महत्व आले आहे.या बाबतीत सध्या असलेल्या तरतूदी पुरेशा नाहीत असे आढळून आले आहे. म्हणून अकृषिक उद्देशाकरिता (बिन शेती कामाकरिता ) वापरण्यात आलेल्या जमिनीचा आकार व्यवस्थित पध्दतीने लावण्याच्यादृष्टीने या प्रश्नाचे काळजीपूर्वक परिक्षण करणे आवश्यक झाले आहे. विधेयकात योजना केली आहे की जमिन ज्या प्रदेशात म्हणजे नगर किंवा नगरेत्तर ( Urban-non-urban ) क्षेत्रात असेल त्याप्रमाणे आणि तिचा ज्या कामाकरिता वापर करण्यात येत असेल त्याचा विचार करुन अकृषि आकार ठरविण्यात यावा.याकरिता नगरेत्तर क्षेत्रातील गावाचे वर्ग-१ व वर्ग २ असे दोन वर्ग जमिनीच्या बाजार किंमतीच्या आधारावर करण्यात आले आहे. वर्ग-१ मध्ये १ चौरस मिटरला २पैसे व वर्ग २ मध्ये एक पैसा या कमाल मर्यादेच्या आत अकृषिक आकार ठरविण्यात येईल. आकाराची किमान मर्यादा कृषिक आकार ( Agricultural assessment ) राहिल.नगर क्षेत्रात मात्र शासनाची संमती घेऊन जिल्हाधिका-याने ठरविलेल्या अकृषिक प्रमाण दराप्रमाणे ( Standard rate of non-agricultural assessment ) - आकारणी करण्यात येईल.जमिनीच्या पूर्ण बाजार किंमतीच्या तीन टक्क्यांच्या वर हा आकार राहणार नाही.जमिनीच्या तुकड्यावर आकार लावताना कोणत्या अकृषिक उपयोगाकरिता त्याचा वापर केला जातो हे ध्यानात घेतले जाईल वर उल्लेख केलेला प्रमाण दर हा राहण्यासाठी वापरलेल्या जमिनीवर आकारण्यात येईल.आर्योगिक कामासाठी हा दर प्रमाण दराच्या दीडपट व वाणिज्य कामासाठी ( commercial ) दुप्पट राहिल ,याशिवाय इतर अकृषिक उद्देशासाठी वापरलेल्या जमिनीकरिता लागू असणारा दर प्रमाण दराच्या खाली व आर्योगिक दराच्या वर राहणार नाही.अकृषिक आकाराची मुदत संपल्यानंतर नवीन आकार लावताना होणारी आत्यंतिक वाढ टाळण्यासाठी पूर्वीच्या अकृषिक आकाराच्या सहा पटीची मर्यादा लावण्यात आली आहे.

अकृषिक उद्देशासाठी परवानगी देण्याची कार्यपध्दती --

कृषिक जमिनीचा वापर अकृषिक उद्देशाकरिता करण्यासाठी परवानगी देण्याची सध्याची कार्यपध्दती अपूरी आहे असे आढळून आले आहे.प्रचलित कायदा - नुसार शेतीच्या जमिनीचा अकृषिक प्रयोजनासाठी उपयोग करावयाचा असल्यास भूमिधारकाने महसूल अधिका-याकडे परवानगी मिळण्याबद्दल अर्ज करावयाचा असतो अशा अर्जाचा निर्णय महसूल अधिका-याने ठराविक मुदतीत अर्जदारास न कळविल्यास परवानगी मिळाली असे समजले जाते. अर्जात जमिनीच्या वर्णनासंबंधी सविस्तर माहिती नसल्यास अथवा त्यात आवश्यक तपशील नसल्यास त्यावर ठराविक मुदतीत निर्णय घेणे महसूल अधिका-यास शक्य नसते व मुदत संपल्यानंतर मात्र परवानगी गृहीत धरुन अर्जादारास ठराविक मुदतीत अर्जावर निर्णय घेणे सुलभ व्हावे म्हणून अशा बाबतीत करावयाचे अर्ज शासनाने नियमाखाली विहित केलेल्या नमुन्यात असावे व तसे नसल्यास ते परत करण्यात यावे अशी विधेयकात तरतूद केली आहे. याशिवाय विहित नमून्यात अर्ज करुन त्याची पोचविल्याच्या तारखेपासून तीन महिन्यात महसूल अधिका-याने आपला निर्णय अर्जदारास कळविला नाही तर अर्जदाराने त्याकडे महसूल अधिका-याचे लक्ष वेधावे व असे करुनही ४५ दिवसाच्या आणखी मुदतीपर्यन्त अर्जदारास निर्णय कळविण्यात आला नाही तर त्यास बिगर शेतीची परवानगी देण्यात आली आहे असे समजावे अशीही तरतूद मध्यप्रदेश भू-राजस्व संहितेस अनुसरुन विधेयकात केली आहे .मात्र अशी गृहीत धरलेली परवानगी सरकारने केलेल्या नियमामध्ये विहित केलेल्या शर्तीस पात्र राहिल असे विधेयकात स्पष्ट केले आहे.

सध्या अकृषिक किंमतीत होणारे बदल आणि जमिनीचा अकृषिक कामासाठी वाढत्या प्रमाणात होणारा वापर विचारात घेऊन हमीच्या कालाची मर्यादा ( quarantee period ) तीस वर्षांऐवजी पंधरा वर्षांची ठेवण्यात आली आहे. हमीचा कालावधी संपला नसतानासुध्दा जमिनीचा उपयोग एका अकृषिक उद्देशापासून दुस-या उद्देशाकडे केला गेला तर आकारात बदल करण्याची विधेयकात तरतूद आहे.अशा प्रकारे वेगवेगळ्या अकृषिक उपयोगावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार जिल्हाधिका-याला देण्यात आला आहे.

या तपशिलवार तरतूदीचा उद्देश हा आहे की, जमिनीच्या अनर्जित उत्पन्नावरील ( Unearnod income ) सरकारचा हक्क पूर्णपणे अबाधित राहावा व कराची आकारणी जमिनीच्या प्रत्यक्ष केलेल्या उपयोगास अनुसरुन व्हावी.

काही कारणासाठी वापरण्यात आलेल्या जमिनीत अकृषिक आकारणीची प्रस्तूत विधेयकान्वये माफी देण्यात आली आहे. खालील प्रयोजनासाठी वापरण्यात आलेल्या जमिनीवर बिनशेती आकारापासून माफी आहे --

१) शेतक-यांनी हातमागासाठी छप-या उभारणारे कुक्कुटपालन व्यवसाय किंवा बागबगीचा तयार करणे यासारखे शेतीस दुय्यम किवा सहायक असलेल्या व्यवसायासाठी किवा राज्य सरकार, त्यासंबंधात केलेल्या नियमात निर्दिष्ट करील अशा इतर व्यवसायासाठी वापरण्यात येणा-या जमिनी --

२) मृताची व्यवस्था लावण्याशी संबंधित असलेल्या कारणासाठी वापरण्यात येणा-या जमिनी.

३) सार्वजनिक पूजेअर्चेसाठीच केवळ भोगवटयात असलेल्या आणि वापरण्यात येत असलेल्या आणि हा अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी रुढी, अनुदान यास अनुसरुन किंवा इतर कारणामुळे जमिन महसूल माफी असलेल्या जमिनी.

४) ज्या शैक्षणिक किंवा धर्मादाय प्रयोजनाचा लाभ, धर्म, वंश, जात, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही गोष्टींचा आधार न घेता सर्व नागरिकांस मिळत असेल अशा शैक्षणिक किंवा धर्मादाय कारणासाठी वापरण्यात येणा-या जमिनी.

५) राज्य सरकार या अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये त्यात निर्दिष्ट करण्यात आले असेल अशा मुदतीसाठी व अशा शर्तीस अधीन राहून ज्या कोणत्याही सार्वजनिक कारणासाठी वापरण्यात येणा-या जमिनींना जमीन महसूलाची माफी देईल अशा कोणत्याही इतर सार्वजनिक कारणासाठी वापरण्यात येणा-या जमिनी

प्रचलित कायद्यामध्ये अशा प्रकारे आपोआप माफी देण्याची तरतूद नाही. मात्र संबंधित व्यक्तिच्या किंवा संस्थाच्या ( Institutions or bodies ) अर्जावरुन अकृषिक आकारणीची माफी देण्याचे मर्यादित अधिकार शासनाने प्रस्तूत केलेल्या नियमाखाली महसूल अधिका-यास देण्यात आलेले आहेत. प्रस्तुत विधेयकातील

या तरतूदीमुळे वर सांगितलेल्या प्रयोजनासाठी कराची माफी आपोआप मिळू शकेल व हे एक या विधेयकाचे वैशिष्ट्ये आहे.

शहर व गावठाण मोजणी --

या संदर्भात गाव, शहर किंवा नगर यांच्या क्षेत्रातील जागांचा विशेष निर्देश करणे योग्य होईल. मुंबई विभागांत बहुतेक सर्व प्रमुख शहरांची शहर मोजणी होऊन नकाशे तयार झाले आहेत. मराठवाड्यात मात्र कायद्यात आवश्यक तरतुदींच्या अभावी हे काम मागे पडले आहे. विदर्भांतही मोजणी खर्च वसूल करण्याची पुरेसी तरतूद कायद्यात नसल्यामुळे या कामास अडचणी उपस्थित होत आहेत. यासाठी विधेयकात सर्व राज्यात शहर व गावठाण मोजणी सुरु करण्याची तरतूद मुंबई कायद्यानुसार केली आहे. यामुळे शहरातील व खेड्यातील सर्व रहिवाश्यांना आपल्या स्थावर मालमत्तेच्या मालकी हक्कांसंबंधीचे रेकॉर्ड, नकाशे व सनद या द्वारे मिळण्याची सोय होईल व यावरुन मालकी हक्काबद्दल होणारी भांडणे अगर वाद कमी होतील.

गावठाणातील घरांच्या जागांवरील जमीन महसूल माफ --

शहर मोजणीची विधेयकात तरतूद करताना हल्ली अस्तित्वात असलेली घरांच्या जागांवर महसूल आकाराची माफी चालू ठेवण्यात आली आहे. याशिवाय नगरेतर विभागात (नॉन अर्बन एरिया ) घराच्या जागावरील कर माफ करण्याची बिलात तरतूद केली आहे. राज्याला कितीही आर्थिक नुकसान सहन करावे लागले तरी पण खेड्यातील कोणाही व्यक्तीला आपल्या घराच्या जागेला कर द्यावा लागू नये अशी शासनाची इच्छा आहे.

खाणी आणि खनिजे --

या विधेयकात खाणी आणि खनिजे यावरही राज्याचा अधिकार स्पष्ट केला आहे. ही तरतूद तीनही विभागास समान आहे. मुंबई व मराठवाडा विभागाती तरतुदी मात्र या बाबतीत पुरेशा नाहीत. कारण खाणीतून खनिज पदार्थ काढण्या-करिता किंवा खाणी चालविण्याकरिता खाजगी जमिनीतून जाणाऱ्या सरकारच्या हक्काची स्पष्ट तरतूद त्यात नाही. याबाबतीत मध्यप्रदेश भू-राजस्व संहितेतील

तरतूदी अधिक योग्य आहेत असे आढळून आले म्हणून सरकारच्या खाणी व खनिजावरील अधिकाराचा योग्य प्रकारे वापर करण्यासाठी खाजगी जमिनीतून जाणाच्या अधिकाराची या विधेयकात तरतूद करताना त्या जमिनीच्या पृष्ठभागाचे जे नुकसान होईल त्याची भरपाई करण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

सार्वजनिक हक्क --

सार्वजनिक उपयोगासाठी म्हणजे गुरे चरण, स्मशान गावक-यांना घरगुती कामासाठी लागणारे जळावू व इतर लाकूड व शेतक-यांना अवजारासाठी लागणारे लाकूड यासाठी सरकारी जमिन राखून ठेवण्याची व्यवस्था तिन्ही कायद्यात केली आहे व तिचा या विधेयकात समावेश करण्यात आला आहे. मध्यप्रदेश भू-राजस्व संहितेत जळाऊ लाकूड, मुरुम, दगड, गुरे चरण वगैरे बाबतीत जनतेच्या सार्वजनिक हक्काची नोंद करण्याची तरतूद केली आहे. ही नोंद विस्तार पत्रकात केली जाते. खाजगी जमिनीवरील लोकांच्या हक्कांची नोंद ` वाजिब उल अर्ज ` म्हणजे ग्राम-व्यवस्था पत्रक या नावाच्या पत्रकात केली जाते. मध्यप्रदेश संहितेतील या तरतूदी फार उपयुक्त आहेत. आणि गावात अशा जमिनीबाबत रुढ असलेल्या रिवाजांच्या अस्तित्वाबाबत या पत्रकाचा प्राथमिक पुरावा म्हणून उपयोग होतो असे आढळून आले आहे. म्हणून विस्तार पत्रक व वाजिब-उल-अर्ज या मध्यप्रदेश भू-राजस्व संहिते--तील तरतूदींचा समावेश या विधेयकात करुन त्या तरतुदी विशिष्ट क्षेत्रांना अधिसूचनेद्वारा (नोटिफिकेशन ) लागू करण्याचा आधिकार शासनाला दिला आहे.

राखीव जमिनीत गावक-यांना दिलेल्या अधिकाराशिवाय इतर सरकारच्या मालकीच्या संरक्षित बनाव्यतिरिक्त पडित जमिनीतील जळाऊ लाकूड विनामुल्य नेण्याची सवलत गावक-यांना या विधेयकाने दिली आहे. तसेच शेतक-यांना शेतीच्या अवजारासाठी लागणारे लाकूड विनामुल्य सदर जमिनीतून घेऊन जाण्याची सवलतही दिलेली आहे. ही तरतूद हैद्राबाद जमीन कायद्यातून घेतली आहे व तिचा गरिब शेतक-यांना बराच उपयोग होण्यासारखा आहे.

हक्क नोंदणी --

जमिनीच्या हक्कांची नोंदणी, शेतीकरिता लागणारे पाणी व स्वत:च्या शेतात शेती कामासाठी जाण्या-येण्याचे मार्ग हे शेतक-यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न आहेत. जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार आणि कर्जाची देवाण घेवाण यांचा हक्क नोंदणीशी घनिष्ठ संबंध आहे. या विधेयकाने हक्क नोंदणी व जमिनीच्या हक्कात वेळोवेळी होणारे फेरफार, त्याची चौकशी व त्यानुसार हक्क नोंदणीत दुरुस्ती यासंबंधि आवश्यक व पुरेशा तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. कुळकायद्यानुसार असलेल्या कुळांना धरुन सर्व कुळांची हक्क नोंदणी पत्रकात करण्याची व्यवस्था आहे. याशिवाय जे व्यवहार सब रजिस्ट्रारच्या कचेरीत रजिस्टर करण्यात येतात त्याची सूचना रजिस्टर झाल्याबरोबर संबंधित मामलेदार व तलाठी यांना सब - रजिस्ट्रारने द्यावी अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे जमिनीच्या अशा व्यवहाराची नोंद विनाविलंब फेरफारपत्रकात होत जाईल आणि त्यामुळे हक्क - नोंदणी पत्रक अद्यावत दुरुस्त ठेवण्याला मदत होईल अशी अपेक्षा आहे. अज्ञानी शेतक-यांचा यामुळे फार मोठा फायदा होणार आहे.

शेतीसाठी दुस-याच्या जागेतून पाणी नेण्याचा हक्क --

पुष्कळ वेळा शेतक-याला आपल्या जमिनीत पाणी नेण्यासाठी दुस-या शेतक-याच्या जमिनीचा वापर करावा लागतो. त्या दुस-या शेतक-याने जर पाणी नेण्यास परवानगी दिली नाही तर तो शेतकरी आडचणीत येतो यातून कमी कधी शेतक-यात वादही निर्माण होतात ही आडचण दूर करण्यासाठी दुस-याच्या शेतातून पाणी नेण्याची परवानगी देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. या तरतुदीअन्वये जर एखाद्या व्यक्तीला शेतीसाठी आपल्या मालकीच्या पाण्याच्या ठिकाणाहून पाणी नेण्यासाठी दुस-याच्या जमिनीतून नळा टाकणे, आवश्यक असेल व त्या जमिनीच्या मालकाशी खाजगीरित्या करार होऊ शकत नसेल तर याकरिता मामलेदाराकडे अर्ज करता येतो. चौकशी करुन मामलेदाराला अशा प्रकारची परवानगी देण्याचा व तिची अंमलबजावणी करण्याचा अधिकार आहे. या बाबतीत योग्य नुकसान भरपाई देण्याची तरतूदही आहे. मामलेदाराच्या निर्णयावर अपील नाही. मात्र जिल्हाधिका-याला फेरतपासणीचा अधिकार आहे. या तरतुदीमुळे शेतक-याला दुस-याच्या शेतातून पाणी नेण्याची परवानगी लवकर

मिळून राष्ट्राचे उत्पादन वाढण्यासही मदत होईल.

बांधावरुन जाण्याचा हक्क --

शेतक-याला आपल्या शेतात दुस-या लोकांच्या शेताच्या बांधावरुन शेतीच्या कामासाठी जाण्याचा स्थानिक रिवाजाप्रमाणे असतो पण या बाबतीत वाद उपस्थित झाला.तर मामलेदाराला या हक्काची चौकशी करुन निकाल देण्याची तरतूद विधेयकात केली आहे. त्यामुळे बांधावरुन जाण्या-येण्याच्या हक्काच्या लहान सहान वादासाठी दिवाणी कोर्टात जाण्याची आवश्यकता शेतक-याला पडणार नाही.

अनुसूचित जमातीसाठी तरतुदी --

काही विशिष्ठ विभागात जिल्हाधिका-यांच्या परवानगीशिवाय अनुसूचित जमातीच्या लोकांच्या जमिनीची हस्तांतरणे करण्यास मनाई करण्याची या विधेयकात तरतूद केली आहे.त्यामुळे अनुसूचित जमातीचे जमिनीवरील हितसंबंध संरक्षित झाले आहेत.

जिल्हाधिका-यांच्या परवानगीशिवाय असे हस्तांतरण झाले तर संबंधित व्यक्तीच्या अर्जावरुन जिल्हाधिका-याला ते रद्द करता येते. जिल्हाधिका-यांची परवानगी घेऊन असे हस्तांतरण ( ट्रान्स्फर ) केले गेले तर त्याची नोंद हक्क नोंदणी पत्रकात होण्यापूर्वी ही परवानगी तहसीलदारासमोर हजर करावी व ती परवानगी व तत्संबंधी पुरावा हजर केल्याशिवाय हक्क नोंदणी दुरुस्त होऊ नये अशी व्यवस्था विधेयकात केली आहे.

जमीन महसूलाची वसूली --

जमीन महसुलाच्या वसुलीबद्दल तरतूदीही तीनही विभागात जवळजवळ सारख्याच आहेत. भूमिधारकाकडून जमीन महसूल म्हणून येणे असलेली थकबाकी ही त्याने धारण केलेल्या जमिनीवरील मुख्य भार ( पॅरॅमॅाऊन्ट चार्ज ) असल्यामुळे ती देण्यात आली नाही तर ती जमिन जप्त होण्यास पात्र होते. महसूल अधिका-यांला जर असे वाटले की, एकदा भूमिधारक जमिन महसूल देण्यात कसूर करील तर पीक कापण्यास किंवा विकण्यास प्रतिबंध करणे यासारखे सावधगिरीचे उपाय त्याला

अंमलात आणता येतील.याची तरतूद मुंबई व हैद्राबाद कायद्यांच्या धर्तीवर करण्यात आली आहे. इतर सक्तीच्या उपायांचे बाबतीत बोलावयाचे म्हणजे कसूर करण्याची स्थावर मालमत्ता ताब्यात घेऊन तिची व्यवस्था करण्यासंबंधीची तरतूद हैद्राबाद महसूल कायद्याच्या १२४ व्या कलमांचे धर्तीवर करण्यात आली आहे. ज्या बाबतीत कब्जेदार जमिन सुधारणा कर्जाच्या कायद्यान्वये सरकारकडून कर्ज घेतो आणि त्या रकमेचा विनियोग सुधारणा करण्याकरिता करतो पण कराराच्या शर्तीनुसार कर्जाची फेड करु शकत नाही अशा बाबतीत वरील तरतुदीची आवश्यकता प्रामुख्याने दिसून येईल. अशा बाबतीत जर वसूलीकरिता जमिनीची विक्री झाली तर करारादाखल सुधारणा केलेल्या जमिनीस मुकावे लागेल. या परिस्थितीत जमिनीवरील सुधारणा वाया जाऊ नये आणि कर्जाची परतफेड झाल्यावर तिचा उपयोग भूमिधारकाला करता यावा या उद्देशाने जमिनीचा ताबा घेऊन व तिच्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड करुन ती जमिन मूळ भूमिधारकाला परत करण्याची व्यवस्था विधेयकात केली आहे. अशा तरतूदीमुळे थकबाकी शेतकऱ्यास आपल्या जमिनीस मुकावे लागणार नाही.कसूरदाराला दिवाणी तरुंगात ठेवण्याची तरतूद विधेयकात आहे पण ज्या शेतकऱ्याची जमिन महसूलाची थकबाकी असेल त्याचे बाबतीत अपवाद करण्यात आला आहे.

नाममात्र बोली ( Nominal bid ) -

कधी कधी कसूरदाराला ( defaulter ) मालमत्ता लिलावाद्वारे विक्रीस काढताना कोणी बोली बोलत नाही. व त्यामुळे ती मालमत्ता विकून वसूली करणे जवळजवळ अशक्य होते अशा परिस्थितीकरिता सध्याच्या कायद्यात काही तरतूद नाही अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारतर्फे मालमत्ता नाममात्र बोलीवर घेण्याची तरतूद विधेयकात केले आहे अशी मालमत्ता नंतर सरकारकडून विकण्यात आली तर सरकारकडे येणे असलेली रक्कम व खर्च वजा करुन उरलेली रक्कम कसूरदारास देण्याची तरतूद आहे.याशिवाय १२ वर्षांचे आत कसूरदाराने सरकारी देणे भरले तर त्याची मालमत्ता त्याला परत करण्याची तरतूद आहे.

महसूल अधिका-याची कार्यपध्दती --

महसूल अधिका-याच्या कार्यपध्दतीबाबत तिन्ही कायद्यात महत्वाच्याबाबतीत ठळक मानाने सारख्या तरतूदी आहेत. या तरतुदींचा विधेयकात अंतर्भाव करताना प्रकरणाची सुनावणी, तहकुबी आणि प्रकरणे दुस-या अधिका-याकडे वर्ग करणे, वकीलाद्वारे प्रकरणात हजर राहणे, अशा प्रकारच्या विदर्भातील तरतुदी सामाविष्ट केल्या आहेत. उद्देश हा की प्रकरणाची चौकशी पध्दतशीर व्हावी .मुंबई आणि हैद्राबाद कायद्यातील चौकशीची (इन्क्वॉरी) संक्षिप्त (समरी ) आणि साधारण (ऑर्डिनरी ) अशा वर्गवारी करण्याबद्दलची तरतूद या विधेयकात स्वीकारण्यात आली आहे.त्यामुळे प्रकरणे त्वरित निकालात काढणे सुलभ होईल.

अपील ,फेरतपासणी ,पुनर्विलोकन ( Appeal Revision ,Reveinue )

अपिलसंबंधीच्या तरतुदी चालू कायद्यात सारख्याच आहेत.त्याचा अंतर्भाव करताना निर्णय घेण्यापूर्वी पक्षाकाराची बाजू ऐकून घेण्याची तरतूद करण्यात आली आहे अशी तरतूद मुंबईच्या कायद्यात नाही.प्रकरणाचे महत्व व स्वरुप याचे अनुसार वेगवेगळ्या महसूल अधिका-यांना मुंबई कायद्यात फेरतपासणीचे अधिकार देण्यात आले आहेत.त्या धर्तीवर विधेयकात तरतूद केली आहे. आणि विदर्भ आणि हैद्राबाद येथील कायद्यांचे धर्तीवर पुर्नविलोकनाची ( Review ) तरतूद केली आहे.

नियम करण्याचे सरकारचे अधिकार --

या विधेयकाचे उद्देश कार्यान्वित करण्यासाठी सरकारला नियम करण्याचा अधिकार दिला आहे.लोकांच्या सूचना व आक्षेप मागविण्यासाठी हे नियम प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तसेच हे नियम विधानमंडळासमोर ठेवण्याची तरतूद आहे. विधानमंडळाला या नियमात फेरफार करता येतील.मुंबई आणि हैद्राबाद विभागाचे बाबतीत ही नवीन तरतूद आहे.

आर्थिक परिणाम --

हे भाषण संपण्यापूर्वी या विधेयकाच्या प्रमुख आर्थिक बाबींचा थोडक्यात गोषवारा देणे योग्य होईल. राज्यातील महालांचे रुपांतर तालुक्यात केल्यामुळे तालुका झालेल्या सर्व महालात मामलेदार नेमावे लागतील, त्यामुळे सरकारला अंदाजे वार्षिक रु.३४,७८ आर्थिक खर्च सोसावा लागेल.

मालकी जमिनीवरील झाडांचे सरकारचे सर्व राखीव हक्क जमिन मालकास दिल्यामुळे सरकारची वार्षिक सुमारे ३० लाख रुपये हानी होईल असा अंदाज आहे.

नगरेत्तर क्षेत्रात गाव ठाणातील घरांच्या जागांवर जमिन महसूल माफ केल्यामुळे थोडी आर्थिक हाणी होणार आहे. तिचा अंदाज करणे कठीण आहे. विधेयकात पूर्वापार रुढीप्रमाणे आणि प्रचलित कायद्याप्रमाणे चालू असलेली कर माफी कायम ठेवण्यात आली आहे.त्यामुळे याशिवाय ज्या जागा करास पात्र झाल्या असल्या त्याच्यापुरतीच ही माफी प्रत्यक्ष अंमलात राहिल.

अकृषिक ( बिनशेती ) उपयोगाबाबत विधेयकात नगरेतर क्षेत्रात जे कमाल दर लागू करण्यात आले आहेत ते मुंबई विभाग व मराठवाडा यांतील प्रचलित दरापेक्षा जास्त आहेत.नगर क्षेत्रात ( अर्बन एरिया ) प्रमाण दराची पध्दत (स्टीम ऑफ स्टॅन्डर्ड रेट्स् ) मराठवाडा विभागात प्रथमच लागू करण्यात येणार असल्याने तेथे महसूल नियमाखाली ठरविलेल्या दर एकरी दरापेक्षा हे प्रमाण दर जास्त राहतील .सध्या मराठवाड्यात कमाल दर,एकरी १५ रुपये आहे पण प्रमाण दर,जमिनीचा बाजार किंमत,उपयोग व महत्व यावर अवलंबून असल्याने हे प्रमाण दर लावणे अयोग्य होणार नाही.

समारोप --

मालकी जमिनीतील सरकारी राखीव झाडांचे हक्क शेतकऱ्यांसाठी सोडणे, राखीव जंगलाव्यतिरिक्त सरकारी पड जमिनीतील झाडापासून सरपणासाठी, किरकोळ घरगुती अगर शेतीच्या कामासाठी मोफत लाकूड नेण्यास परवानगी, हातमाग ,कुक्कुटपालन,इत्यादी दुय्यम व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना बिगर शेती आकार नसणे,खेड्यात राहणाऱ्या लोकांकडून त्यांच्या राहण्याच्या जागेवर बिगर शेतीआकार न घेणे,शैक्षणिक व धर्मादाय संस्थाना बिगर शेती कराची माफी ,बिगर शेती आकारणी खेड्यामध्ये कमी व शहरामध्ये जास्त इत्यादि तरतुदींकडे आपण बारकाईने पाहिल्यास त्यात शासनाच्या समाजवादी समाज रचनेच्या धोरणाचे पडसाद उमटलेले आपणास दिसतील.

हे विधेयक तयार करण्यापूर्वी राज्याच्या तीनही विभागातील प्रचलित कायद्यातील तरतुदी, नियम व महसूल व्यवस्था यांचा काळजीपूर्वक अभ्यास करण्यात आला आणि ज्या बाबी, त्या मग कोणत्याही विभागातील असोत विशेषकरुन उपयुक्त व योग्य आढळल्या त्याची विधेयकात तरतूद करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच प्रत्येक विभागातील कायद्यातील सर्वोत्तम बाबींचा अंतर्भाव विधेयकात करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पण त्याचवेळी एखाद्या विशिष्ठ क्षेत्रातील एखादी बाब विशेष महत्वाची वाटली तर तिच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले नाही. विधेयकाचा मसुदा तयार करताना शासनापुढे प्रचलित कायद्याच्या दुरुस्तीबाबत काही प्रकरणे विचाराधीन होती, त्याचाही परामर्श घेऊन आवश्यक गोष्टींचा समावेश या विधेयकात करण्यात आला आहे.

हे विधेयक तयार करताना त्यातील तरतुदीचापरिणाम, सध्याच्या प्रचलित महसूल व्यवस्थेमध्ये सर्वसाधारण व्यक्तीला मग ती कोणत्याही विभागातील असो, हानीकारक असे बदल करण्यात सहसा येणार नाही याची दक्षता व काळजी घेतली आहे. भूमिधारकांना पूर्वीच्या कायद्याप्रमाणे मिळालेले अधिकार सुरक्षित ठेवण्यात आले आहेत व मी सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की भूमिधारकांचे सध्या अस्तित्वात असलेले कोणतेही अधिकार काढून घेण्याचा या विधेयकाचा उद्देश नाही. उलट आपणास दिसून येईल की काही ठिकाणी या अधिकारात वाढ करण्यात आली आहे. शेतकरी व ग्रामीण जनता तसेच अनुसूचित जाती यांच्या कल्याणासाठी काही विशेष तरतूदी या विधेयकात करण्यात आलेल्या आहेत. सभागृहाला या विधेयकात विवाद्य अशी कोणतीही बाब सहसा आढळणार नाही. अशी मला आशा आहे. हे विधेयक संमत झाल्याने संपूर्ण महाराष्ट्र राज्याला एक समान व सर्वंकष असा जमीन महसूल कायदा लागू करण्याची फार दिवसाची इच्छा मूर्त स्वरुपाला येईल.

<u>दुष्काळी व अन्नधान्याच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी केलेल्या सुधारणा --</u>

विरोधी पक्षाचे सन्माननीय सभासद सर्वश्री मा. पिन्टो, मा. कारखानीस व डॉ. मंडलिक इत्यादींनी या राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

आणि अन्नधान्याची परिस्थिती यासंबंधीची चर्चा या सन्माननीय सभागृहात करण्यासाठी जो प्रस्ताव आणला आहे,त्याबद्दल धन्यवाद देवून मा.बापूनी याबाबतीत शासनाचे धोरण अगदी स्पष्ट आहे.अन्नधान्याच्या बाबतीत किंवा दुष्काळाच्याबाबतीत या सन्माननीय सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सभासदाकडून मग तो विरोधी पक्षाचा असो अगर आमच्या पक्षाचा असो,एवढेच नव्हे तर बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीकडून शासनाला जर कोणतीही विधायक सुचना करण्यात आली तर शासन त्या सूचनेची जरुर नोंद घेईल. आणि व्यव्हार्य अशा सूचना अंमलात आणण्याचा कळकळीने आणि मनोभावे प्रयत्न करील. शासनाचे हे धोरण असल्यामुळे हा प्रस्ताव आल्यानंतर शासनाला आनंदच झाला. किंबहुना शासनाच्या वतीने असा प्रस्ताव येथे चर्चेसाठी आणण्याचा विचार होता. परंतु त्यापूर्वीच विरोधी पक्षाने हा बहुमान पटकावलेला आहे. या राज्यात दुष्काळी परिस्थिती उद्‌भवली आहे. पिण्याच्या पाण्याची फार मोठी टंचाई निर्माण झाली आहे आणि जनावरांसाठी वैरण मिळत नाही व त्यावर उपाय योजना केली जावी. अशी इच्छा या सन्माननीय सभागृहात व्यक्त करण्यात आली आहे. माझे मित्र सन्माननीय मित्र डॉ.मंडलिक हे डॉक्टर असल्यामुळे साहजिकच आरोग्याच्या बाबतीत बोलले.आरोग्याच्यादृष्टीने लोकांची काळजी घ्यावी असे त्यानी म्हटले व त्याबद्दल मी त्याचा आभारी आहे. शासन दर वर्षी काही ना काही प्रमाणात दुष्काळी कामे हाती घेतच असते व अशा रितीने दुष्काळी परिस्थिती हाताळीत असते.कधी या जिल्ह्यात दुष्काळ असतो तर कधी त्या जिल्ह्यात किंवा जिल्ह्याच्या एखाद्या तालुक्यात दुष्काळ असतो म्हणून जेव्हा जेव्हा दुष्काळी परिस्थिती निर्माण होईल तेव्हा तेव्हा या परिस्थितीला योग्य रितीने तोंड देता यावे आणि लोकांना त्यामुळे त्रास होऊ नये याची व्यवस्था करण्याची शासनाने शिकस्त केली आहे. चालू वर्षाचा दुष्काळ मात्रविस्तृत प्रमाणात होईल अशी शक्यता दिसते. सन १९५२ साली जो दुष्काळ पडला तशाच प्रकारचा दुष्काळ जाणविण्याची शक्यता दिसत आहे. आणि म्हणून या वर्षी अधिक विस्तृत प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे याची जाणिव शासनाला यापूर्वीच झाली आहे.आणि म्हणून शासनाने अवर्षण पडेल असे दिसल्याबरोबर त्याला तोंड देण्यासाठी आवश्यक असलेली पावले टाकण्यास सुरुवात केली आहे.

दर आठवड्याला प्रत्येक जिल्हात,प्रत्येक तालुक्यात किती पाऊस पडला ,याचा परिणाम पिकांवर काय झाला यासंबंधिचे अहवाल घेतले जातात. याबाबतीत प्रत्येक जिल्हाधिका-यांना अशा सूचना दिल्या आहेत की,आपल्या जिल्हात कोठे दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे असे त्यांना दिसले तर त्यांनी तातडीने आणि तत्परतेने उपाय योजले पाहिजेत. आता एखाद्या ठिकाणी या सूचनांची अंमलबजावणी होत नाही असे जर सन्माननीय सदस्यांच्या निर्दशनास आले तर ते त्यांनी जरूर शासनाच्या नजरेस आणून द्यावे. जिल्हाआधिका-यांना असे कळविले आहे की,ज्या ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे अशी त्यांची खात्री होईल तेथे त्यांनी टेस्ट केसेसची कामे सुरु करावी आणित्यासाठी त्यांनी सरकारच्या मंजूरीची वाट पाहू नये.५,००० रुपयापर्यन्त ची कामे त्यांनी स्वत:च्या अधिकारात सुरु करावी.आणि अशा रितीने त्यांना १०० खेड्यांच्या पॅाकेटमध्ये एकूण ५०,००० रुपये खर्चाची कामे ताबडतोब सरकारची मंजूरी न घेता सुरु करण्याचा अधिकार दिला आहे. बिकट परिस्थिती निर्माण झाली तर त्यांना ताबडतोब कामे सुरु करता यावी या दृष्टीने शासनाने त्यांना हे अधिकार दिले आहेत.याबाबतीतील सर्व सन्माननीय सभासदांच्या सूचना आम्ही ऐकून घेऊन त्यांच्यावर विचार करणार आहोत. एखाद्या ठिकाणी पैसे नसतील तर ते देण्याची आमची तयारी आहे. विधायक दृष्टीकोनातून कोणतीही सूचना शासनाला करण्यास आपल्याला कोणतीच हरकत नाही.५,००० रुपये खर्चापर्यन्तची कामे सुरु करण्याचा अधिका-यांना दिला आहे.त्याचप्रमाणे प्रत्येक कमिशनरला २५,००० रुपये खर्चापावेतोची कामे मंजूर करण्याचा अधिकार दिला आहे.महसूल खात्याच्या सेक्रेटरींना ५०,००० रुपये पर्यन्तच्या कामाला मंजूरी देण्याचा आधिकार दिला आहे. आणि त्यापेक्षा मोठी कामे असतील तर सरकारकडे यावे लागेल.त्याना सुध्दा मंजूरी देण्याची सरकारची तयारी आहे.आता मोठमोठया प्रकल्पाची कामे सुरुच आहेत.त्यांच्यावर जास्त कामगार जाण्याच्यादृष्टीने शासन जरुर व्यवस्था करील. परंतु छोटे-छोटे प्रकल्पसुध्दा या दुष्काळाच्या परिस्थितीला तोंड देण्याच्यादृष्टीने सुरु करण्याचा विचार आहे.विशेषत: पाटबंधाच्याची कामे,छोटया तलावांची कामे,मग ते परलोकेशन टॅक्स असले तरी चालेल,बंडिगची कामे यांना प्राधान्य द्यावे अशा सूचना दिल्या आहेत.यापैकी कोणतेही काम करता येण्याजोगे नसेल तरच

रस्त्याची कामे हाती घेतली जावीत असे सूचविले आहे.

कोणत्याही नागरिकाला जर काम पाहिजे असेल तर त्यांच्या राहण्याच्या जागेपासून पाच मैलाच्या आत ते मिळाले पाहिजे त्याला पाचमैलाच्यापलिकडे जावे लागू नये.त्यानंतर जर एखाद्या विभागामध्ये चालू असलेली कामे कमी पडत असतील आणि जेवढया माणसांना काम द्यावयाचे आहे त्यांना त्यामुळे देता येत नसेल तर त्या त्या जिल्हाच्या कलेक्टरने स्टेट स्केअरसिटी वर्क्स सुरु करावे. या कामाची अंमलबजावणी जिल्हा परिषदांच्याकडून होत आहे.त्यांना सांगण्यात आले आहे की, जर त्याचा स्टॉक या कामाकरिता अपुरा पडत असेल तर त्यांनी बिल्डिंग आणि कम्युनिकेशन व रोडस आणि बिल्डिंग या खात्याकडून स्टाफ मागवावा.त्याच प्रमाणे पैशाची अडचण भासू नये म्हणून सर्व जिल्हा परिषदांना प्रत्येकी दहा ते पंधरा लक्ष रुपये देण्यात आले आहेत. ही रक्कमच जवळजवळ तीन कोटी रुपयाच्या घरात जाते. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदांना मायनर इरिगेशनचे काम अपुरे वाटत असेल तर त्यांनी सुरु करावे व त्याकरिता त्यांना सरकारने २१ लक्ष रुपयाची रक्कम दिलेली आहे हे पैसे कमी पडले तर त्यांना पुन्हा आणखी पैसे देण्यात येतील. आपल्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मागेच जाहिर केले आहे की या वर्षी आपल्या राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे तेव्हा कोणत्याही इसमाला काम मिळाले नाही असे होता कामा नये.

शेती ही पावसावर आधारित आहे व पाऊस हा निसर्गावर अवलंबून आहे. अवर्षाणामुळे जी परिस्थिती निर्माण होणार आहे तिला तोंड देण्यासाठी जी पैशाची आवश्यकता आहे त्यात कमी सरकार कमी पडणार नाही.या दुष्काळी परिस्थितीतून मार्ग काढण्याचा आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केला पाहिजे.संकटाला भिऊन पळता कामा नये.या कामाकरिता सर्वांनी सहकार्य दिले पाहिजे.त्याला तोंड देण्याची आपण तयारी ठेवली पाहिजे.आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की आपण सर्वांनी खांद्याला खांदा लावून उभे राहिले पाहिजे.दुष्काळाच्या काळात राज्यातील प्रत्येक माणसाला काम देण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली आहे. त्याचप्रमाणे सर्वांना वेळच्यावेळी मजूरी मिळाली पाहिजे.याकरिता मजूरीचे जे दर ठरविण्यात आले आहेत ते ज्या ज्या विभागात जी शिड्यूल असेल त्यांच्या ९० टक्के असलेच पाहिजे. अशा सूचना देण्यात आल्याआहेत.जास्तीत जास्त पुरुषाला

२ रुपये ,स्त्रियांना दीड रुपया आणि मुलांना एक रुपाया असे मजूरी चे दर ठरविण्यात आले आहेत.

एक सन्माननीय सभासद - स्त्री पुरुषांच्या मजूरीच्या दरात फरक का ?

मा.श्री.बापूंचे उत्तर - निसर्गानेच स्त्री आणि पुरुषात फरक केला आहे.यापूर्वी पुरुषांना सव्वा रुपया मंजुरी मिळत होती ती आता दोनरुपये करण्यात आली आहे.आपणास माहित असेल की पूर्वी दुष्काळी परिस्थिती आली असताना लोकांना चार सहा आणे मजुरी मिळत होती.ती परिस्थिती आज राहिलेली नाही.

त्याप्रमाणे पूर्वी चार आणे आणे वारी असली तरच दुष्काळी कामे घेण्यात येत होती.आता चार ते सहा आणे जरी आणेवारी असली तरी दुष्काळी कामे घेण्यात यावयाची आहेत.६ आण्याच्या खाली जेथे आणेवारी असेल तेथे स्केअर सिटीची कामे सुरु करण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत. जेव्हा या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाले नव्हते आणि ब्रिटिश लोक या देशावर राज्य करीत होते तेव्हा जमिन महसूल ही त्याची मुख्य उत्पन्नाची बाब होती आणि म्हणून तो शक्य तेवढया जास्त प्रमाणात वसूल झाला पाहिजे. याबद्दल ते काळजी घेत असत.तेव्हा कदाचित आणेवारी जास्त आणेवारी लावण्यात आली पाहिजे अशा अलिखित अथवा लिखितही असतील कदाचित सूचना तत्कालीन राज्य कर्त्यांकडून महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आल्या असण्याची शक्यता आहे. परंतु आता आपल्या देशावर ब्रिटिशांचे राज्य नसून आपलेच राज्य आहे.ब्रिटिशांना या देशातील शेतकरी मेले काय किंवा जगले काय,त्याचे सोयरसुतक असण्याची फारसी जरुरी नव्हती परंतु आता तशी स्थिती नाही.सध्याचे राज्य हे लोकांचे राज्य आहे. लोकांची सोय पाहणे हे सरकारचे प्रथम कर्तव्य आहे. आणि ते प्रामाणिकपणे कर्तव्ये सरकार बजावत आहे हे पद मी सांभाळण्यापूर्वी नामदार मुख्यमंत्री स्वत: हे खाते सांभाळत असत.त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी महसूल अधिकाऱ्यांना अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत की आणेवारी जसी असेल तशीच लावण्यात यावी,सरकारला पाहिजे म्हणून कमी किंवा सरकारला पाहिजे म्हणून जास्त आणेवारी लावण्यात येवू नये . ही गोष्ट त्यांनी ठिकठिकाणी घेतलेल्या जाहिर सभांतून तर

सांगितलीच आहे व कलेक्टर्सना याबाबतीत बजावून सांगितले आहे.

ही दुष्काळी कामे वेळच्या वेळी सुरु व्हावी म्हणून डिव्हिजनल लेवलवर कमिशनरांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नियुक्त करण्यात आली आहे. या कमिटीमध्ये सर्व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, बांधकाम व दळणवळण खात्याचे व पाटबंधारे विभागाचे सर्व सुपरिटेंडिंग इंजिनियर्स यांचा समावेश करण्यात आला आहे.

दुष्काळातील पाण्याच्या टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी विहिरीचे पाणी खोल गेले आहे त्या त्या ठिकाणी अशा विहिरी अधिक खोल करण्यासंबंधीचे कळविले आहे. ज्या ठिकाणी विहिरी ,ओढे अजिबात आटले आहेत त्या ठिकाणी नवीन विहिरी खोदण्यासही सांगण्यात आले आहे. ज्या ठिकाणच्या तळ्यातील गाळ काढल्यामुळे पाणी उपलब्ध होण्याची शक्यता असेल त्या ठिकाणी तळ्यातील गाळ काढावा असेही सांगण्यात आले आहे. तसेच नवीन विहिरी खोदण्यासाठी ठिकठिकाणी ब्लास्टिंग मशीन देण्याची व्यवस्था करीत आहेत. प्रत्येक जिल्ह्यात ५ बोअरिंग मशीन्स आणि प्रत्येक पंचायत समितीला एक ब्लास्टिंग मशीन दिले जाईल. या मशीन्स प्रत्यक्षात दिली जातील.

जनावरांच्या साठी सरकारतर्फे कॅटल कॅम्पस उभारुन त्याठिकाणी जनावरांना चारा व पाणी यांची सोय करण्यात आली. तसेच वैरणीची नासधूस होऊ नये आणि काटकसरीने कडबा व गवत वापरले जावे यासाठी कडबा व गवत कापून घावे व गवत व कडबा याची बचत व्हावी यासाठी कडबा व गवत कापण्याचे मशीन प्रत्येक ग्रामपंचायतींना देण्याची व्यवस्था करण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीमुळे अन्नधान्याची तूट अधिक भासणार म्हणून मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना असे आवाहन केले की नद्या, ओढे, नाले या ठिकाणचे पाणी शेतकऱ्यांनी त्यांना परवानगी आहे असे समजून वापरावे आणि त्यावर खाद्य धान्याचे उत्पादन काढावे आणि जनावरांना चारा उत्पादन करावा. तसेच ज्या ठिकाणी धरणे असतील त्या ठिकाणी पाण्याची जी कॅपॅसिटी (मर्यादा) असते

त्यात कॅरिईंग ओव्हर पाणी असते म्हणजे एखाद्या धरणाची मर्यादा एक लाख एकराला पाणी देण्याची आहे असे ज्यावेळी म्हटले जाते त्यावेळी सरकारजवळ सव्वा लाख एकराला पाणी उपलब्ध होऊ शकेल एवढे पाणी असू शकते. हे २५ हजार एकर जमिन भिजू शकेल एवढे पाणी रब्बीच्या व खरिपाच्या पिकाला मोफत द्यावे अशी सूचना केली आहे. त्यामुळे हजारो एकर जमिन पाण्याखाली येईल. अवर्षणामुळे जाणारी पिके वाचतील. या सोईमुळे पीक उत्पादन घेण्यास मदत होणार होती.

हायब्रीड-मका, हायब्रीड-ज्वारी लावणाऱ्या शेतकऱ्यांना पाण्याच्या सवलती देण्याचा सरकारचा विचार आहे. त्याच बरोबर दुष्काळी लोकांना दिलासा देण्यासाठी आणखी एक महत्वपूर्ण गोष्ट करण्यात आली ती म्हणजे फॉरेस्ट एरियात ज्याठिकाणी वीस पेक्षा कमी झाडे असतील त्या ठिकाणी ठराविक रेडियंटची जमीन ज्या ठिकाणी कल्टिव्हेशन होऊ शकते अशी जमिन लॅन्डलेस लोकांना द्यावी असा निर्णय घेण्यात आला अशा प्रकारे १.७२ लक्ष एकर जमिन लॅन्डलेस लोकांना देण्याची सोय करण्यात आली ती जमिन कसता यावी म्हणून दर एकरी १०० रुपये, रेक्लमेशनसाठी, आणि खड्डे बुजविण्यासाठी, तालीसाठी, बैल, औत घेता यावे यासाठी, खतासाठी प्रत्येक शेतकऱ्याला देण्याचे धोरण ठरविण्यात आले. यापैकी २५ टक्के लोक आणि ७५ टक्के सबसिडी असा फॉर्म्युला राहणार आहे. ज्या ज्या तालुक्यात लॅन्डलेस लोकांना अशा प्रकारे पैसा दिला नसेल त्यांना ही मदत मिळवून देण्याच्या दृष्टीने सर्व सभासदांनी सहकार्य केले तर शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळेल आणि स्केअरसिटी कमी करण्याच्या दृष्टीने त्या मदतीचा उपयोग होईल इकडे लक्ष दिले. अशा अनेक महत्वपूर्ण सोई दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी योजना आखल्या गेल्या होत्या व परिस्थितीला मक्कमपणे मा. बापूंनी तोंड दिलेले होते.[१]

मा. महसूल मंत्री श्री. राजारामबापू पाटील यांनी मुंबई पण कर (दुरुस्ती) अधिनियम, १९६५ हे विधेयक मांडले.

L.A. Bill No.VI of 1965 ( A Bill further to Amend the Bombay Betting Tax Act, 1925.

<u>Shri R.A.Patil</u> ( Deputy Minister for Revenue ):- Sir, I beg to introduce L.A.Bill No.VI of 1965 ( A Bill further to amend the Bombay Betting Tax Act, 1925.

Sir,while doing so,I may state that in exercise of the powers conferred upon him by clause(i) of Article 2070 of the constitution of India,of Governor of Bombay is pleased to recommend to the Maharashtra Legislative Assembly the considerat-ion of the Bombay Betting Tax ( Amendment of Bill, 1965.

सध्या मुंबई पण कर अधिनियम,१९२५ च्या कलम ५ व (१) च्या तरतुदीनुसार पणगणनायंत्र कर आणि पण हे कर आकारण्याची कमाल मर्यादा पैजेच्या किंवा पणाच्या रुपाने दिलेल्या रकमेच्या शेंकडा साडेबारा टक्केपर्यन्तच आहे. ही कमाल मर्यादा वाढविल्याखेरीज हे कर त्यापेक्षा अधिक दराने आकारता येत नाहीत.

आजमितीला पणगणनायंत्र कर शेंकडा साडेबारा टक्के दराने आणि पण कर शेंकडा १२.२८ टक्के दराने आकारले जात आहे.भावी काळात राज्याच्या महसूलात ज्या वेळी वाढ करणे आवश्यक वाटेल तेव्हा अशी वाढ करण्याच्यादृष्टीने ही कमाल मर्यादा शेंकडा १५ टक्क्यापर्यन्त वाढविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.आणि त्यासाठी अधिनियमात आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे.परंतु ह्या विधेयकान्वये जरी कमाल दर शेंकडा १५ टक्के होणारा असला तरी कर आकारणी त्या दराने ताबडतोब केली जाईल असे नाही. कर आकारणीचा दर सरकार वेळोवेळी ठरविल तरी पण असा दर शेंकडा १५ टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही.

या दोन्ही करापासून अंदाजे १२ ते १५ लाख रुपये उत्पन्न येण्याची शक्यता आहे. सन १९२५ सालचे विधेयक बदलून मा.बापूनी १९६५ मध्ये साडेबारा टक्के असलेला कर १५ टक्यापर्यन्त वाढविण्यासाठी हे विधेयक मांडलेले होते. व विधेयक

प्रामुख्याने राज्याचे उत्पन्न वाढविण्याच्यादृष्टीने मांडलेले होते म्हणून ते महत्वपूर्ण आहे.[१०]

मा.श्री राजारामबापू पाटील यांनी महसूल मंत्री असताना साखर कारखान्याला ऊस पुरविण्यासाठी स्टेट फार्मिंगची स्थापना करुन ज्या शेतक-यांच्या जमिनी सरकारने सिलींगच्या कायद्याप्रमाणे ताब्यात घेतल्या त्या जमिनी त्या शेतक-यांना परत करण्याचा निर्णय घेतला व भारतातील सर्व राज्यात सिलींगचा कायदा अंमलात आणावा यासाठी प्रयत्न केले.त्यामुळेच हा कायदा संबंध देशभर करण्यात आला. या सिलींगच्या कायद्याप्रमाणे प्रत्येक साखर कारखान्यांनी आपल्या ताब्यात फक्त ६६ एकर जमिन ठेवावी व त्यापेक्षा जास्त जमिनी असतील तर त्या काढून घेण्यात येतील असे सांगितले,त्याप्रमाणे ज्यांच्या जमिनी या कारखान्यासाठी देण्यात आल्या आहेत,त्यांना त्याच्या जमिनीवर दुस-या ठिकाणी देण्याची व्यवस्था केली,त्यामुळे या सिलींगच्या कायद्याचा उपयोग ज्याप्रमाणे श्रीमंतांना झाला,त्याच प्रमाणे गोरगरीब शेतक-यांना देखिल झाला.या कायद्याचा उपयोग खेड्यातील लोकांना मोठयाप्रमाणात झाला.[११]

त्याच बरोबर मा.बापूनी मुंबई महापालिका मधील नॅशनल रेयॉन, ओरिअेंटल टिंबर कार्पोरेशन आणि अंजठा पेपर व जनरल प्रॉडक्टस लि.,यांच्या विज दरातील तफावती संदर्भातील श्री .अेस.जी.पाटकर व श्री श्याम ग.कोचरेकर यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले व १९४८ साली नॅशनल रॅयान ही कंपनी दर वर्षी लाखो रुपयाचा फायदा कमावित आहे,त्यांना १०,००० क्युबिक फीट पाण्याकरिता २ रुपये द्यावे लागतात व तसा करार १९४८ साली या कंपनीने केलेला असल्याचे सांगून ओरिअेंटर टिंबर कार्पोरेशनला आणि अंजठा पेपर आणि जनरल प्रॉडक्टस लि., यांना १०,००० क्युबिक कीट पाणी ४ रुपये ५० पैसे या दराने देण्यात आल्याचे सांगून ४ रुपये ५० हा दर १९६२ सालामध्ये करण्यात आला असल्याचे सांगून नॅशनल रेयॉन कंपनीशी करार केला होता.त्यानुसार (१९५६ ) च्या कायद्यामुळेच या कंपनीला २ रुपये दराने १०,००० क्युबिक कीट पाणी दिले जात असल्याचे मा.राजारामबापू पाटील यांनीसांगितले व या कराराची मुदत संपल्यानंतर त्यांच्या पाणी दर वाढविण्याचा विचार केला जाईल असे मा.बापूनी सभागृहात सांगितले.[१२]

मा.राजारामबापू पाटील यांनी महाराष्ट्राचे महसूल मंत्री असताना उस्मानाबाद जिल्हामध्ये रस्ते रुंदीकरण करण्याचे महत्वपूर्ण कार्य सिझनल एम्लॉयमेंट स्कीमच्या व स्केअरसिटी मेझार्स या स्वीकमच्या नियंत्रणाखाली करुन दुष्काळ व पिडित भागातील लोकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करुन प्रवास करण्यासाठी वाहते,उपलब्ध करुन दिली. त्यामुळे हेही कार्य महत्वपूर्ण ठरले.[१३]

मा.बापूंनी १९६६ साली दुष्काळ पडल्यानंतर संबंध महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेखाली जी गोरगरीब लोकांच्यासाठी दुष्काळी कामे हाती घेतली होती, ती अनुत्पादक कामे सुरु न करता दुष्काळी कामे सुरु करीत असताना उत्पादक कामे करण्यात यावीत यासाठी बंडिंगची कामे,लहान बंधा-यांची कामे,तळी वगैरे दुरुस्त करण्याची कामे,ड्रेनेजची कामे,तसेच एखाद्या गावामध्ये रस्ते नसतील तर त्या गावामध्ये रस्त्याची कामे सुरु व्हावीत व त्याची ताबडतोब अंमल बजावणी करण्यात यावी असे आदेश दिले.त्याचप्रमाणे शेतीच्या कामासाठी व ज्याठिकाणी दुष्काळी कामे सुरु करीत असताना त्याठिकाणी टिकाव,फावडी,कुदळी,पहारी,अशासारख्या आवजाराचा मुबलक पुरवठा व्हावा व सर्वांना त्याठिकाणी कामे मिळावीत तेथील लोकांना अवजारांची कमतरता भासू नये याची दक्षता घेण्याची सूचना दिली व दुष्काळ पिडीत लोकांना दिलासादेण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.[१४]

महाराष्ट्र शेतकी महामंडळावरच्या अहवालावर चर्चा करीत असताना मा.महसूलमंत्री श्री राजारामबापू पाटील यांनी साखर कारखान्यातील कामगारांच्या विषयीचा प्रश्न अत्यंत बारकाईने सोडविला असल्याचे दिसून येते.त्यानी साखर कामगारांना दररोज ४ रुपये १५ पैसे किमान वेतन ठरविले होते.त्याचप्रमाणे कायम नोकराला १६० रुपये ६० पैसे वेतन देण्याचे कायम केले आहे.याशिवाय नोकरांना (कामगारांना बोनस,त्याची पेन्शन,ग्रॅच्युइटी वगैरे गोष्टींची सोय उपलब्ध केली ) कारखान्यातील कामगारांच्या मुलांच्यासाठी शाळा उघडल्या,तसेच त्या ठिकाणी वाचनालये उघडण्यात आली.आणि इतर रिक्रिएशनची साधनेही उपलब्ध करुन देण्यात आली.तसेच तेथील लोकाना दुधाचा प्रश्न उपलब्ध होवू नये यासाठी दुध डेअरीची सोय केली.अशा विविध सुविधा उपलब्ध करुन कामगाराच्यामध्ये दिलासा निर्माण केला.[१५]

त्याचबरोबर शुगर फॅक्टरीजच्या स्थावर मालमत्तेचे योग्य प्रकारे मूल्यमापन झाले आहे की नाही हे पाहण्यासाठी त्या त्या शुगर फॅक्टरीजच्या वतीने मेसर्स टॅापलिस ॲण्ड हार्डिंग(इस्टर्न ) प्राव्हेट लिमिटेडची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले. हे कॅार्पोरेशन जेव्हा सुरु करण्यात आले तेव्हा महाराष्ट्रामध्ये जे जे साखर कारखाने होते तेथे सिलींगचा कायदा लागू करण्यात आला.त्यावेळचे मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण आणि रेव्हिन्यूचे मंत्री व आजचे (१९६६ ) मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यानी प्रयत्न करुन या महामंडळाची स्थापना केली व त्यानुसार जमिनीची लागवड करण्यास एक योजना आखून त्याला भारत सरकारची मान्यताही मिळविली.आता या महामंडळाचे कार्य अतिशय कुशलतेने चाललेले आहे.[१६]

मा.बापूंनी महसूल विभागामध्ये जे रेव्हेन्यू ॲाफिसर्स असतात त्याना निरनिराळ्या नावाने संबोधण्यात येत असल्याचे सांगितले.पश्चिम महाराष्ट्रामध्ये काही अधिकाऱ्यांना म्हणजे कलेक्टरच्या नंतरचा जो अधिकारी असतो त्याला प्रांत ॲाफिसर म्हणतात.तालुक्याच्या अधिकाऱ्याला मामलदार समजण्यात येते. मामलदाराच्या वरच्या अधिकाऱ्याला तहसीलदार असे समजले जाते आणि गावाच्या अधिकाऱ्याला तलाठी म्हणतात,विदर्भामध्ये आणि मराठवाड्यामध्ये या अधिकाऱ्यांना वेगळ्या संज्ञा आहेत.तेथे मामलतदाराला तहसीलदार समजले जाते आणि महालकऱ्याला नायब तहसीलदार संबोधण्यात येते. तलाठ्याला पटवारी ही संज्ञा देण्यात आलेली आहे.एकाच सरकारच्या अधिकारक्षेत्रातील निरनिराळ्या तलाठ्याला पटवारी ही संज्ञा देण्यात आली आहे. एकाच सरकारच्या अधिकार क्षेत्रातील निरनिराळ्या विभागातील कामांचे एकसूत्रीकरण करावयाचे असेल तर तेथील अधिकाऱ्यांना निरनिराळ्या नावाने संबोधले जावे हे चांगले लक्षण नाही म्हणून देशातील सर्व अधिकाऱ्यांना सारख्याच नावाने संबोधण्यात यावे असे निर्णय घेण्यात आले. प्रांत ॲाफिसर ऐवजी विभागीय अधिकारी ही संज्ञा मान्य करावी, मामलतदाराऐवजी तहसीलदार हे नाव मान्य करावे,महालकऱ्याऐवजी नायब तहसिलदार हे नाव ठेवावे.तसेच पश्चिम महाराष्ट्रातील तलाठी हे नावही तसेच ठेवण्यात यावे. विदर्भामध्ये तलाठ्यांच्या कार्यक्षेत्राला पटवारी सर्कल असे समजण्यात येते.बिगर शेतीसाठी जी जमिन राखून ठेवण्यात येते त्याला गावठाण म्हणतात.यासाठीही

निरनिराळे शब्द वापरण्यात येतात.त्याऐवजी गावठाण हा एकच शब्द सर्व ठिकाणी वापरण्यात यावा अशा त-हेचा निर्णय घेण्यात आलेला आहे.[१७]

त्याप्रमाणे जमिन महसूल विधेयकातील कलम ४ मध्ये एक फार महत्वाचा बदल सुचविण्यात आला आहे.महसूल खात्याला म्हणजेच सरकारला कोणत्याही भागात बदल करण्याचा अधिकार आहे .महसूल विभागात बदल करण्याचा हा जो अधिकार आहे त्याचा जसा उपयोग करायला पाहिजे तसा केला जात नाही.कोणत्याही गावाचा एक भाग दुस-या गावात घालण्याची किंवा एखादा भाग दुस-या भागातून काढावयाचा अधिकार आहे.हा राज्यात अनेक वाड्या,तांडे,किंवा वस्त्या अशा आहेत की,त्या गावापासून फार दूर आहेत आणि त्या एका विशिष्ठ गावात मोडत असल्याने त्याना सर्वस्वी त्या गावावर अवलंबून रहावे लागते हा वाड्याचे किंवा तांड्याचे गावापासूनचे अंतर जास्त असते त्याची लोकसंख्याही ४००-५०० च्या वर असते परंतु त्या केवळ एका गावाचे भाग म्हणून मानण्यात आल्याने त्यांना सर्वच कामासाठी तकावी घेण्यासाठी किंवा विकासाच्या इतर कामासाठी त्या गावात यावे लागते,त्यामुळे त्या लोकांना फार त्रास होतो त्या गावच्या पटवा-याचे दप्तर, ग्रामपंचायत किंवा सहकारी सोसायटया याचे मुख्य ऑफिस हे त्या गावी असल्याने हा वाड्यातील लोकांना सर्वच कामासाठी त्या गावी यावे लागते आणि त्यामुळे त्यांना फार त्रास होतो .सरकारचा कोणी अधिकारी गावाला भेट द्यायला गेला तर तो हा वाड्या किंवा तांड्याकडे फिरकतही नाही तो फक्त त्या गावाला जातो त्या गांवाशी संबंधित असलेल्या तांड्यात किंवा वाड्यात तो जातच नाही. अशा अनेकांचा अनुभव असल्याने हा प्रश्न बारकाईने पाहिल्या नंतर ज्या वाड्या किंवा तांड्या अथवा वस्तीची लोकसंख्या ३०० च्या वर असेल तर त्यांना स्वतंत्र गावाचे स्थान देण्यात यावे असे ठरविण्यात आले.हामुळे त्या लोकांना विकासाच्या कामामध्ये भाग घेता येईल हा वाड्यांना हामुळे स्वतंत्र ग्रामपंचायतीही मिळू शकतील व त्याचा सर्वांगीन विकास होईल यासाठी मा.बापूंनी हे अतिशय धाडसी पाऊल टाकलेले दिसून येते.[१८]

त्या बरोबर जमिन महसूल विधेयकातील कलम नं.२० मध्ये असे सांगितलेले आहे की जमिन कोणाच्या मालकीची नसेल ती जमिन सरकारच्या मालकीची आहे असे

समजण्यात येईल.अशाप्रकारे सरकारकडे एखादी जमिन आली असेल तर ज्याच्याशी त्या जमिनीचा संबंध असेल त्याला जर आपल्यावर अन्याय झाला असे वाटत असेल तर दिवाणी कोर्टामध्ये जाऊन न्याय मिळविण्याची व्यवस्था केली आहे.यामध्ये त्याने एक वर्षाच्या कालावधित दिवाणी कोर्टात जावे अशी तरतुद आहे. चिकित्सा समितीने ह्यावर बराच विचार करुन हि सवलत देण्यात आली. महसूल अधिका-याने एखादा निर्णय दिल्यावर अपील करण्याचा अधिकार असावा आणि शेवटचा निर्णय दिल्यानंतरही कोर्टामध्ये जाण्याची मुभा असावी हा कालावधी एक वर्षाचा ठेवण्यात यावा असे ठरविण्यात आलेले आहे असे मा.बापूंनी कलम नं.२० मध्ये सांगितलेले आहे.[१९]

तसेच याजमिन महसूल विधेयकातील महत्वाची गोष्ट करण्यात आली आहे ती अशी की,ह्या राज्यात जे जमिन धारक आहेत त्याचा जमिनीत वाढणा-या झाडावर त्याचा पूर्ण अधिकार मान्य करण्यात आला आहे.ह्या झाडाची कापणी जमिनधारक करु शकतात.या विधेयकातील बाबी बारकाईने पाहून त्यातील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.पहिली गोष्ट म्हणजे सर्व जमिनधारकांना त्याच्या जमिनीवर असणा-या झाडाची तोड जास्त होण्याची भिती आहे,त्यामुळे झाडे तोडण्यावर थोडे नियंत्रण घालण्यात आले आहे.

दुसरी भीती अशी होती की,नवीन तरतुदीप्रमाणे जी राखीव झाडे होती त्यावरही त्या लोकांची मालकी झाली.परंतु असे दिसून आले की,त्या भागात काम करणारे जे जंगल कॉन्ट्रॅक्टर्स होते ते जास्त हुशार असल्याने व त्यांना एकंदर कायद्याचे जास्त ज्ञान असल्याने हे लोक खेड्यातील जमिनधारकाना फसविण्याची भिती होती. सर्व जमिनधारक कायद्याने त्यांच्या जमिनीत असणा-या झाडाचे मालक झाले आहेत हे त्या खेड्यात राहणा-या कित्येक जमिनधारकाना माहिती देखील नसते.आणि जंगलात काम करणा-या ठेकेदाराना हे माहित असल्याने आमच्याकडे अनेक अशा तक्रारी आल्या आहेत ह्या लोकांनी ह्या कायद्याने शेतक-यांना झाडावर जे हक्क मिळत होते ते हक्कच विकत घेऊन टाकले आहेत. ह्यामुळे जमिन धारकाचे फार नुकसान होणार आहे ही गोष्ट लक्षात घेऊन कमिटीने अशा प्रकारे ठेकेदारानी जर काही व्यवहार केले असतील तर ते

बेकायदेशीर आहेत असे ठरविले आहे व तशी तक्रार ह्या कायद्यात केली आहे.[२०]

एखाद्या जमिनधारकांने जर आपल्या जमिनीचा लॅन्ड रेव्हिन्यू भरला नसेल तर त्याची जमिन विकण्याचे अधिकार महसूल अधिका-यांना देण्यात आले आहेत. ह्यामुळे अशी अडचण येणार आहे की, त्याला ती जमिन कधीच परतमिळू शकणार नाही. परंतु त्यांनी जर आपली थकबाकी परत केली तर त्याला ती जमिन परत मिळण्याची तरतूद असावी असे चिकित्सा समितीला वाटले, त्यामुळे एखाद्याने जर आपली थकबाकी तीन वर्षांच्या आत परत केली तर त्याला आपली जमिन दुस-या कोणाही शेतक-याला एकसाली लावणीच्या बोलीने देण्याची व्यवस्था या विधेयकामध्ये करण्यात आली आहे.

तसेच या विधेयकामध्ये शेतीची जमिन बिगर शेती उपयोगाकरिता वापरण्याची सोय करण्यात आली आहे व त्यासाठी संबधित शेतक-याला सरकारची परवानगी घ्यावी लागेल ही तरतूद विधेयकांच्या कलम ४४ मध्ये केलेली आहे. जर एखाद्या शेतक-यांला आपली जमिन बिगर शेती उपयोगाकरिता आणावयाची असेल तर त्याने कलेक्टरकडे तसा अर्ज करावा आणि जर त्याला कलेक्टरकडून तीन महिन्याच्या आत उत्तर मिळाले नाही तर त्या शेतक-याने पुन्हा कलेक्टरकडे रिमार्यंडर पाठवावे आणि रिमार्यंडर नंतरही जर ४५ दिवसात त्याला परवानगी मिळाली नाही तर त्याला तशी परवानगी मिळाली असे गृहित धरण्यात येईल. जर पहिल्या अर्जांनंतर तीन महिन्यात कलेक्टरकडून त्याला परवानगी मिळाली नाही तर त्याला तशी परवानगी मिळाली असे शेतक-यांने गृहित धरावे आणि आपल्या कामाला लागावे.[२१]

त्याच बरोबर या विधेयकामध्ये दुसरा एक महत्वाचा बदल करण्यात आला आहे तो म्हणजे पूर्वी जमिन मालकांना बिगर शेतीकरिता जमिन करुन घेण्याची तरतूद केली होती. परंतु जर कुळाला तशी आवश्यकता भासली तर त्याला आपल्या ताब्यातील जमिन बिगर शेती करण्याच्या उपयोगाची करुन घेता येत नसेल ह्यासाठी तरतूद करण्याची समितीने प्रयत्न केला आहे. जमिनीच्या मालकाला किंवा जमिनीवरील कुळाला जर आपली जमिन बिगर शेती जमिन करुन घ्यावयाची असेल तर मालकाला कुळाच्या संमतीने आणि कुळाला जमिन मालकाच्या संमतीने

आणि कुळाला जमीन मालकाच्या संमतीने तसा अर्ज केल्यास आपली जमीन बिगर शेतीच्या कामाला उपयोगी म्हणून करून घेता येईल.

शेतकऱ्यांच्यासाठी खाते पुस्तिका --

शेतसारा दिला की नाही,खेतसारा किती आहे ,कर्ज किती आहे ,ते दिले की नाही,वेगवेगळ्या जमिनीवर कोणती पिके येतात.जमिनीवर कुळ आहे किंवा नाही वगैरे पीकपाण्याची नोंद करण्याचे अधिकार पटवाऱ्याला आहेत. यासाठी या गोष्टीचा समावेश असलेले एक पुस्तक तयार करण्यात आले.त्यामध्ये जमिनीसंबंधीची माहिती सर्व माहिती नोंदविली जाईल,त्या जमिनीचे हिस्से, पोटहिस्से,त्या जमिनीवर भार आहे किंवा नाही कर्ज आहे किंवा नाही,ती जमिनी तारण आहे किवा काय यासंबंधीची माहिती ज्या त्या शेतकऱ्याला समजावी म्हणून खातबाऱ्याच्या उताऱ्याचा फॉर्म पुस्तकात घातलेला आहे.कर्जाच्या हप्त्याची आणि इतर आवश्यक बाबींची नोंद या पुस्तकामध्ये केली आहे.या खाते पुस्तिकामुळे शेतकऱ्याच्या मनात असलेली भिती दूर होईल .या पुस्तिकेची जी किंमत असेल ती देऊन संबंधिताने ते पुस्तक घेतले पाहिजे.या पुस्तिकेमुळे मा.बापूचे कार्य संबंध महाराष्ट्रभर प्रसिध्द झाले.[२२]

खातेपुस्तिकेनंतर मा.राजारामबापू पाटील यांनी शेतकऱ्यांची बाकी वसूल करण्याचे जे अनेक उपाय आहेत त्यात जमिन विक्रीला काढणे हा एक उपाय आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या शेतावरील उभे पिक जप्त करण्याचा,पीक अडवून धरण्याचा किंवा ते विकण्याचा अधिकार,प्रिकॉशनरी मेझार्स म्हणून मूळ विधेयकातील कलम १७०,१७१,१७२,१७३,१७४ व १७५ या अन्वये सरकारकडे होता. जमिन विक्री करण्याचा अधिकार सरकारकडे असताना त्या माणसाचे पीक जप्त होऊ नये , शेतातून कापण्यात येऊ नये यासाठी वरील सर्व कलमे नष्ट करण्यात आली.

शेतकऱ्यांची बाकी वसूल करण्यासाठी ज्या गोष्टी जप्त करण्याचा अधिकार सरकारला आहे त्यात काही वस्तुंना पूर्वीच्या विधेयकात एक्झेमशन करण्यात आले होते. यात शेतीची अवजारे,कपडे,असे दागिने की जे अंगावरुन काढल्यामुळे अपवीत्र

असे कृत्य वाटते या वस्तूंचा समावेश होता.त्या वस्तु वगळण्याचे ठरविले आहे. शेतक-याजवळ असलेले धान्य जप्त करावयाचे असेल तर नवीन पीक येईपर्यन्त खाण्यासाठी आवश्यक असलेले धान्य,बियाण्यासाठी आवश्यक असलेले धान्य जप्त करता येणार नाही. किंवा जप्तीचे पैसे देण्यासाठी विकता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली.[२३]

तसेच जिल्हाधिका-याला काही बाबतीमध्ये अधिकार देण्यात आले. उदा. मोफत कुरणात गुरे चारण्याच्या हक्कासंबंधी कलम २३ मध्ये,विवक्षित जमिनीतून अनाधिकृतपणे काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाची किंमत वसूल करण्यासंबंधी कलम २४ आणि २७ मध्ये,आणि जळाऊ लाकडे तोडण्यासंबंधी कलम २८ मध्ये अधिकार कलेक्टरला देण्यात आले,त्याला कोणाचाही विरोध असू नये व कलेक्टरचा निर्णय अंतीम मानण्यात आले आहेत.त्याचप्रमाणे कलम २०(१) अन्वये जमिन वितरण करण्याचे आधिकार कलेक्टरना देण्यात आले आहेत. हे अधिकार त्यांनी परस्पर वापरण्यापेक्षा त्यांनी नियमानुसार वापरावेत.

अशा प्रकारचे अनेक या विधेयकानुसार मा.बापूंनी बदल घडवून आणले हे काम अतिशय गुंतागुंतीचे आणि अवघड असे होते असे असले तरी अशा कठीण प्रश्नावर त्यांनी संयमाने प्रत्येक गोष्ठ खोटया प्रतिष्ठेला बळी न पडता पार पाहल्या ,त्यांच्या या कार्याबद्दल मा.सर्वश्री कृष्णाराव धुळूप,मा.डी.बी.पाटील, मा.जी.डी.लाड, मा.के.आर.पाटील,मा.रामजीवन-चौधरी आणि मा.वसंतकुमार पंडित तसेच मा.श्री.श्याम गं.कोचरेकर ( मालवण ) यांनी कौतुक केलेले आहे.[२४]

महसूल मंत्री असताना मा.राजारामबापूंनी शेतक-याच्या हितासाठी अनेक कायदे केले ते नुसते कायदे करून थांबले नाहीत तर त्या कायद्याची अंमलबजावणी होते की नाही याची देखिल त्यांनी काळजी घेतली.पुढे त्यांनी आणली एक कायदा केला तो म्हणजे जमिन सुधारण्यासाठी महसूल आकार माहे करण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आली,त्यामुळे प्रत्येक शेतीवरील महसूल आकारणी त्या त्या क्षेत्रातील उत्पादन क्षमतेवर आकारण्यात येणार होती.एखादी जमिन सुपिक असेल, त्या जमिनीची उत्पादन क्षमता चांगली असेल तर संपूर्ण सर्व्हे नंबरचा विचार करून सरसकट महसूल आकारण्याची पध्दत १९६५ पर्यन्त होती.एक-एक सर्व्हे नंबर

फार मोठा असायचा त्यातील एक तृत्यांश भाग असणारी जमिन हलक्या प्रतीची असायची पण त्या शेताचा सुध्दा सारा महसूल शेतक-यांना भरावा लागत असे ही गोष्ट मा.बापूंच्या अभ्यासू नजरेतून सुटली नाही,त्यामुळे वरील कायदा करुन शेतक-यांच्या मनाला दिलासा देण्याचे पवित्र कार्य मा.बापूंनी केले.[२५]

तसेच मा.बापूंनी महसूल मंत्री असताना वाड्या,छोटया-छोटया वसत्या मिळून तीनसे लोकसंख्या असणा-या गावांना स्वतंत्र गाव आणि तेथे वेगळी ग्राम - पंचायत अस्तित्वात आणण्याचा निर्णय घेतला.आजपर्यन्त गावावर अवलंबून असणा-या परंतु वाडीत,वस्तीवर राहणा-या लोकांना मा.बापूंच्या या निर्णयाने दिलासा मिळाला.या देशातील सात लाख खेडी सोडून त्या खेड्यांच्याही पलीकडे वाडीत राहणारा,वस्तीवर राहणारा जो माणूस आहे त्याच्यासाठी विकासाच्या संधीचे महाद्वार उघडले पाहिजे असा माणुसकीचा ओलावा असणारा विचार मा.बापूंनी करुन त्या वाडीला स्वतंत्र गावाचा दर्जा देऊन व ग्रामपंचायती स्थापन करुन त्या गावाना शासनाच्या सोई-सवलती मिळवून दिल्यामुळे या निर्णयाचे संबंध महाराष्ट्रामर स्वागत करण्यात आले.[२६]

तसेच मा.बापूनी शेतक-याच्या जमिनीविषयी मूळ मालकीला म्हणजे ज्याच्या नावे ती जमीन आहे त्याला काही फेरफार करावयाचे असतील तर त्याने स्वत: त्याच्या इच्छेने रितसर लेखी अर्ज केल्याशिवाय जमिनीची सातबारा उता-यात फेरफार करता येणार नाहीत या विषयीचे या जमोदर तलाठी यांचेकडे असलेले अधिकार काढून घेण्यात येत आहेत. ते अधिकार तालुका तहसिलदार कचेरीमधील सब रजिस्ट्रार यांचेकडे देण्यात आले आहेत. जमीन फेरफार नोंदीचे अधिकार तलाठी वर्गाकडून काढून घेतल्यामुळे त्या वर्गातील लोक मा.बापूंच्यावर नाराज होते,त्यांचा असंतोष सवसवत होता.फसवणूक,पिळवणूक,गुंडगिरी,दादागिरी इतक्या गोष्टींना महसूल खात्यापुरता तरी पायबंद घालण्यात मा.राजारामबापू यशस्वी झाले होते.[२७]

अशारितीने महसूलमंत्री असताना मा.राजारामबापू पाटील यांनी सामान्य व गोरगरीब शेतक-याच्या सर्व त-हेच्या नोंदी असणा-या,शेतीच्या विकासासाठी कर्ज मागताना शेतक-यांचा छळवाद व पिळवणूक कमी व्हावी यासाठी खाते पुस्तिका

तयार करुन दिली. या कार्यामुळेच विधानसभेतील सर्व आमदारांनी त्यांना आधुनिक काळातील महाराष्ट्राचा राजा 'तोडरमल' असे यथार्थ वर्णन केले होते.[२८]

मा.बापूंनी महसूल मंत्री असताना अनेक महत्वपूर्ण निर्णय घेऊन महाराष्ट्रा-मधील शेतकरी व सर्वसामान्य लोकांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला.सामान्य लोकांच्या अडचणी दूर केल्या.संबंध महाराष्ट्रभर संपर्क दौरे करुन जनतेला दिलासा दिला. महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेस पक्ष बळकट केला.या त्यांच्या नि:स्वार्थी कार्याचा ठसा महाराष्ट्रातील सर्व नेत्यावर पडल्याचे दिसून येते.बापूनी महसूल खात्यामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणून सत्ता ही लोकांच्या कल्याणासाठी असते असे त्यांनी आपल्या प्रभावी कार्याने महाराष्ट्रीयन जनतेस दाखवून दिले.[२९]

मा.माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांनी मा.राजारामबापूंच्या कार्याचा गौरव केला होता.मा.बापू हे सच्चे कार्यकर्ते होते.त्यांनी महसूल खात्यात कामे करीत असताना सामान्य गोरगरीब लोकांच्या तक्रारीचे निवारण करुन त्यांच्यासाठी ते सतत कार्यरत राहिले ते कार्य करीत असताना राज्याची तिजोरी त्यांनी रिकामी केली नाही तर ती तिजोरी गरीबांच्यासाठी उपयोगी आणली. महसूल खाते हा विभाग तसा गुंतागुंतीचा होता,त्यातील अडचणी सोडविण्यासाठी त्यासाठी तज्ञ व अभ्यासू मंत्र्याची गरज होती,ती गरज व ते कार्य अभ्यासू व तज्ञ अशा मा.राजारामबापू पाटील यांनी प्रामाणिकपणे केले असल्याचे दिसून येते.त्यांनी महसूल विभाग हा सुकर व दिलावह करुन या खात्यातील अनेक त्रुटी नाहिशा करुन हे खाते भक्कम व सुलभ बनविण्याचा मा.बापूंनी प्रयत्न केला,त्यांच्या कार्याची धावती माहिती घेण्याचा या ठिकाणी प्रयत्न केलेला आहे.[३०]

## संदर्भ


१ हुद्दार भवाननराव - विकासगंगा आणणारा भगीरथ
कोल्हापूर (१९८५ )
प्रकाशक - मा.राजारामबापू पाटील
स्मरणिका,इस्लामपूर, पृ.३५.

२ कित्ता - पृ.३६.

३ कारखानीस टी.एस. - राजारामबापू : काही आठवणी,
कोल्हापूर कोल्हापूर (१९८५ )
प्रका.मा.राजारामबापू पाटील स्मरणिका
इस्लामपूर, पृ.१७.

४ फडणीस रा.ता.(पुणे) - कुशल संघटक बापू :
प्रका.मा.राजारामबापू पाटील स्मरणिका
इस्लामपूर,पृ.४६.

५ कारखानीस टी.एस. - राजारामबापू : काही आठवणी,कोल्हापूर
प्रका.मा.राजारामबापू पाटील स्मरणिका
इस्लामपूर,पृ.१८.

६ कित्ता पृ.

७ मरूड रावाराम - कार्य आणि कार्यकर्ते उभे करणारा नेता
इचलकरंजी(१९८५)
प्रका.मा.राजारामबापू पाटील स्मरणिका
इस्लामपूर,पृ.२.

८ महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्ली डिबेटस (मुंबई ) पृ.१६. सोमवार,२९ मार्च.
१९६५.

९ कित्ता - - ८ डिसेंबर,१९६५.

१० कित्ता - - १ एप्रिल १९६५.

११ कित्ता - महाराष्ट्र ॲग्रिकल्चरल लॅन्ड सेलिंग ऑन होल्डिंग(अमेंडिंग)बिल
१ एप्रिल १९६५,मुंबई.

१२ महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्ली डिबेटस(मुंबई) ३१ मार्च १९६५,मुंबई.

१३ कित्ता - ३१ मार्च १९६५,मुंबई.

१४ महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह अॅसेम्ब्ली डिबेटस (मुंबई), २७ मार्च १९६६, मुंबई.

१५ किस्सा - २४ मार्च १९६६, पृ.४३२, मुंबई.

१६ किस्सा - २४ मार्च १९६६

१७ किस्सा - ७ मार्च १९६६, मुंबई.

१८ किस्सा - ७ सप्टेंबर १९६६, मुंबई.

१९ किस्सा - ७ सप्टेंबर, १९६६, मुंबई.

२० किस्सा - ७ सप्टेंबर, १९६६, मुंबई.

२१ किस्सा - ७ मार्च १९६६, मुंबई.

२२ ,, - ७ सप्टेंबर, १९६६, मुंबई.

२३ ,, - ७ सप्टेंबर, १९६६, मुंबई.

२४ ,, - ७ सप्टेंबर, १९६६, मुंबई.

२५ ,, - ७ सप्टेंबर, १९६६, मुंबई.

२६ ,, - ७ सप्टेंबर, १९६६, मुंबई.

२७ प्रा.पाटील लालासाहेब कृ. इस्लामपूर. - मुलाखत - दि.३०-१०-१९९३, वय-५०.

२८ किस्सा - दै.अग्रदूत, सांगली, लेख दि.४-१०-८६, पृ.६.

२९ किस्सा - -,,--

३० दै.महाराष्ट्र टाईम्स(मुंबई) - दि.१७-१-१९८६, पृ.४६.
विशेष स्मरण,
संपादक वसंत विष्णू पाटील.